



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक १५४ * नांदेड * मंगळवार, दि. १० जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## नांदेडसह राज्यात जोरदार पावसाची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात मान्सूनपूर्व पावसाने सुरुवातीला चांगलाच जोर दाखवला होता, मात्र मागील आठवड्यापासून काही भागांत पावसाने विश्रांती घेतली आहे. दरम्यान, १० जूनला कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विशेषतः १० जून रोजी सिंधुदुर्गातील काही भागांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्येही पावसाची शक्यता आहे. नाशिकच्या घाट परिसरात पावसाचा जोर अधिक जाणवण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तसेच, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, बीड, लातूर, नांदेड, औरंगाबाद, हिंगोली आणि धाराशिव या भागांमध्ये ३० ते ५० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे आणि गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

पुणे व सातारा जिल्ह्यांत यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विदर्भात सध्या पावसाची शक्यता कमी आहे, मात्र १२ जूनपर्यंत नागपूर, अकोला, वर्धा, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये वादळी वारे



व पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई, ठाणे व उपनगरांमध्येही उकाडा वाढला असून, १२ जूननंतर पावसाची शक्यता आहे. हवामान खात्याने नागरिकांना इशारा दिला आहे, विजांच्या गडगडाटात झाडाखाली थांबू नका, विजेच्या उपकरणांपासून दूर रहा, शेतकऱ्यांनी पिकांचे संरक्षणासाठी योग्य उपाययोजना कराव्यात आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. राज्यात बदलत्या हवामानामुळे पुढील काही दिवस सतर्कतेची गरज असून, नागरिकांनी खबरदारी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

दि. १२ जूनपर्यंत उर्वरित महाराष्ट्रातील २९ जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी किरकोळ पावसाची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी मान्सूनच्या पावसाच्या ओलीवर व मान्सून सक्रिय झाल्यावर १५ जूननंतर चांगल्या वाफशावर पेरणीचा निर्णय घ्यावा, असं हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितलं.

महाराष्ट्रात दमदार सुरुवातीनंतर थबकलेल्या मान्सूनला आता पुन्हा चालना मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. १३ जूनपासून मान्सून पुन्हा सक्रिय होऊन राज्यात मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. गेल्या आठवड्याभरात मान्सूनने मोठा 'ब्रेक' घेतल्यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. २६ मे रोजी मुंबईत मान्सूनचा प्रवेश झाला आणि त्यानंतर तो गडचिरोलीमार्गे विदर्भात दाखल झाला, मात्र त्याचवेळी पावसाने विश्रांती घेतली. यामुळे खान्देश, नाशिक आणि विदर्भातील उत्तर जिल्ह्यांमध्ये मान्सून पोहोचू शकलेला नाही. त्यामुळे राज्याच्या जवळपास अर्धा भाग पावसाच्या प्रतीक्षेत आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, सध्या मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी पोषक वातावरण नाही, त्यामुळे पुढील चार दिवस किरकोळ पावसाची शक्यता आहे. मात्र १३ जूननंतर वातावरण मान्सूनसाठी अनुकूल होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

### नांदेडमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस

नांदेडसह राज्यात जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असतानाच सोमवारी रात्री नांदेड शहरासह जिल्ह्याच्या काही भागात वादळी वाऱ्यासह पाऊस बरसला.

## अपघातानंतर मध्य रेल्वेचा निर्णय; मुंबईतील लोकल ट्रेनला ऑटोमॅटिक दरवाजे बसवणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** मध्य रेल्वे रेल्वेमार्गावर सोमवारी सकाळी एक मोठा अपघात झाला. लोकलमधून आठ प्रवासी रेल्वे ट्रॅकवर पडले. सकाळी ९:३० वाजतामुंब्रा आणि दिवा दरम्यान ही दुर्घटना घडली. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. तर या अपघातानंतर आता मध्य रेल्वेने मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईतील लोकल ट्रेनला आता बंद होणार दरवाजे बसवण्यात येणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

याबाबत मध्ये रेल्वेचे सीपीआरओ स्वप्नील नीला म्हणाले की, सीएसएमटी ट्रॅक आणि कसारा ट्रॅकवरून दोन लोकल या ट्रॅकवर एकमेकांना क्रॉस करत होत्या. दोन लोकल आजूबाजूला येताच प्रवासी एकमेकांना धडकले आणि ट्रॅकवर पडले. प्रवासी ट्रॅकवर पडल्यानंतर स्थानिक लोकांनी त्यांना रुग्णालयात नेण्यासाठी प्रयत्न केले आले. यानंतर रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. जखमींवर सध्या कळवा येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला आहे.

या अपघातात दोन्ही गाड्या लोकल होत्या. दोन्ही लोकल ट्रकमधले अंतर दीड ते दोन मिटर असते. मात्र, प्रवाशांच्या बॅगा मागे होत्या, त्यामुळे धक्का लागल्याचे प्रवाशाचे म्हणणे आहे. आता रेल्वेने उपाययोजना करण्यासंदर्भात नव्या लाईनचे नियोजन केले आहेत. ठाणे ते सीएसएमटी सहाव्या लाईनपर्यंत अपग्रेड करण्यात येणार आहे. अशा प्रकारची ही पहिलीच घटना घडली आहे. ज्यात दोन्ही बाजूनं लोकल जात असताना फूटओव्हरवर लोकं उभे असताना पडले. अपघातस्थळी सीसीटीव्ही होते की नाही? लोकलमध्ये गर्दी किती होती? यासंदर्भात माहिती घेतली जाईल. याबाबत चौकशी केली जाईल. काही जणांमध्ये लोकलमध्ये भांडणं सुरु होते, अशी देखील माहिती समोर येत आहे. याबाबत आम्ही तपास करत असल्याची माहिती सीपीआरओ यांनी दिली आहे.

तर रेल्वे बोर्डाने निर्णय घेतला आहे की मुंबई उपनगरीय रेल्वेअंतर्गत तयार होणाऱ्या प्रत्येक कोचमध्ये ऑटोमॅटिक दरवाजे बसवले जातील. याशिवाय सध्या वापरात असलेल्या मुंबई उपनगरीय लोकलच्या डब्यांचे पुनर्रचना (रीडिझाईनिंग) करण्यात येणार आहे आणि त्यामध्ये देखील ऑटोमॅटिक दरवाजे बंद होण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, अशी माहिती मध्ये रेल्वेचे सीपीआरओ स्वप्नील नीला यांनी दिली आहे. तर सुरुवातीला पुष्पक एक्स्प्रेसमधून हे प्रवासी पडल्याची माहिती समोर आली होती. मात्र या अपघाताशी पुष्पक एक्स्प्रेसचा संबंध नसल्याची माहिती स्वप्नील नीला यांनी दिली आहे.




## आजीचा नातवाने केला खून

### पावणेतीन लाखांचा ऐवजही केला लंपास



**नांदेड (प्रतिनिधी)–** हिमायतनगर तालुक्यातील टेंभुर्णी येथे एका ७५ वर्षीय आजीचा खून करून नातवाने घरातून २ लाख ७४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. ही घटना आठ जून रोजी उघडकीस आली.

टेंभुर्णी येथील किशनराव दत्तराव वानखेडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ३ जूनच्या सायंकाळी ५ जूनच्या दरम्यान गयाबाई रामजी तवर उर्फ देवसरकर (वय ७५) वर्ष रा. टेंभुर्णी ता. हिमायतनगर यांचा नातू मारोती उर्फ बाळू पांडूरंग वानखेडे (वय ३५) रा. दिघी ता. हिमायतनगर याने आजीचा खून करून तिच्या घरातील २३ ग्रॅम सोन्याचे दागिणे १ लाख ८४ हजार रुपये किंमतीचे आणि ९० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण २ लाख ७४ हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने चोरून नेला आहे. हिमायतनगर पोलीसांनी याप्रकरणी नातवाविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हिमायतनगरचे पोलीस निरिक्षक अमोल भगत तपास करत आहेत.

## अमेरिकेत ऑस्ट्रेलियन पत्रकारावर पोलिसांनी झाडली गोळी

### लॉस एंजेलिसमधील आंदोलने हिंसक वळणावर!

**लॉस एंजेलिस (वृत्तसंस्था)–** अमेरिकेतील लॉस एंजेलिस शहरात सध्या सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान, एका ऑस्ट्रेलियन न्यूज चॅनेलच्या प्रतिनिधी लॉरेन टोमासी यांना पोलिसांनी रबरची गोळी झाडल्याची गंभीर घटना घडली आहे. या निदर्शनांचा तिसरा दिवस असताना, टोमासी शहराच्या डाऊनटाऊन भागातील मेट्रोपॉलिटन डिटेन्शन सेंटरजवळ थेट रिपोर्टिंग करत होत्या.

थेट प्रक्षेपण संपवून काही सेकंद झाले होते, इतक्यात एका पोलिस अधिकाऱ्याने त्यांच्या दिशेने रबर बुलेट फायर केलं. टोमासी यांच्या पायाला ही गोळी लागली आणि त्या वेदनेने किंचाळल्या. सुदैवाने त्यांना गंभीर इजा झाली नाही, मात्र त्या वेदनेत होत्या. कॅमेरा लगेचच बाजूला वळवण्यात आला आणि थेट प्रक्षेपण थांबवण्यात आलं.

ही घटना त्या वेळी घडली, जेव्हा टोमासी आंदोलनकर्त्यांच्या गर्दीत अडकल्या होत्या. त्या आवाजाच्या पार्श्वभूमीवर रिपोर्टिंग करत असताना, अचानक एका आंदोलकाने त्यांच्या कॅमेऱ्यावर हात घातला होता. त्या म्हणाल्या, पोलीस सतत लोकांना हा परिसर सोडण्यास सांगत आहेत, पण आंदोलक ऐकण्याच्या मन:स्थितीत नाहीत. येथे सतत रबर बुलेट्स आणि फ्लॅशबँग्सचा वापर सुरू आहे.

## सिंहस्थ कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये विशेष प्राधिकरण स्थापनेची तयारी

**नाशिक (प्रतिनिधी)–** नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर विशेष प्राधिकरणाची घोषणा करण्यात आली असून, या प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी विभागीय आयुक्तासह २१ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुंभमेळा आयुक्त हे या प्राधिकरणाचे सदस्य सचिव म्हणून राहणार आहेत. या प्राधिकरणाची स्थापना करण्याची अधिसूचना सोमवारी प्रकाशित करण्यात आली असली, तरी त्यावर राज्यपाल राधाकृष्णन यांनी दि. ३ जून रोजीच स्वाक्षरी केली आहे. राज्यपालांच्या सहीने प्राधिकरणाची अधिसूचना राजपत्रात प्रकाशित करण्यात आलेली आहे.

उपाध्यक्षपदी जिल्हाधिकारी या प्राधिकरणामध्ये एकूण २२ सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. नाशिकचे विभागीय आयुक्त हे अध्यक्ष म्हणून राहणार आहेत, तर नाशिकचे जिल्हाधिकारी आणि नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक हे उपाध्यक्ष म्हणून राहणार आहेत.

या प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांमध्ये अहमदनगरचे जिल्हाधिकारी यांच्यासह नाशिक विकास प्राधिकरणाचे आयुक्त, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त, नाशिकच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, त्र्यंबकेश्वर नगरपालिकेचे मुख्याधिकारी, नियोजन विभागाचे उपायुक्त, नियोजन, विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र, राज्य रस्ते परिवहन महामंडळ, आरोग्य विभागाचे उपसंचालक, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता, विद्युत मंडळाचे अधीक्षक अभियंता, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी, सहसंचालक (लेखा व कोषागारे), नाशिक नगररचना विभाग सहसंचालक हे पदसिद्ध सदस्य असतील, तर कुंभमेळा आयुक्त हे सदस्य सचिव असणार आहे.


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308







जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकल जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# रेल्वेच्या निष्काळजीपणाचा जीवघेणा परिणाम

आपल्या देशामध्ये रेल्वे ही देशाच्या विकासाची व जनतेच्या आयुष्याची जीवनरेषा झाली आहे. जगातील सर्वात मोठ्या रेल्वे जाळ्यांपैकी भारतीय रेल्वेचे जाळे एक आहे. परंतु हेच रेल्वेचे जाळे जर मृत्यूचे जाळे ठरत असेल तर लोकांनी प्रवास करायचा तरी कसा? त्यातल्या त्यात मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये तर रेल्वेशिवाय जीवन जगणं अशक्य आहे. मुंबईतील लोकल ट्रेन म्हणजे शहराच्या नाडीचा स्पंदन असलेली वाहतूक व्यवस्था. रोज कोट्यवधी लोक आपले शिक्षण, नोकरी, व्यवसाय, वैद्यकीय उपचार व अनेक गरजांसाठी या लोकल सेवांवर पूर्णतः अवलंबून असतात. परंतु हीच सेवा जर अपयशात परिवर्तीत होऊन मृत्यूची कारणीभूत ठरत असेल, तर ती केवळ एक अपघात मानणे अक्षम्य आहे. सोमवारी सकाळी ९.२० वाजण्याच्या सुमारास मध्य रेल्वेच्या दिवा-मुंब्रा स्थानकांदरम्यान घडलेली दुर्घटना ही केवळ एक दुर्दैवी घटना नसून, रेल्वे प्रशासनाच्या व्यवस्थात्मक निष्काळजीपणाचे ठळक उदाहरण आहे. या घटनेत पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर आठ जण गंभीर जखमी झाले. ही घटना टाळता आली असती, हे स्पष्ट आहे. ही लोकल कसाऱ्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जात होती. दिवा स्थानक सोडल्यानंतर काही अंतरावर मुंब्र्याजवळ ही घटना घडली. सकाळच्या गर्दीच्या वेळेस डब्यांमध्ये खचाखच गर्दी होती. अनेक प्रवासी फुटबोर्डवर उभे होते, त्यांच्या पाठीवर मोठ्या आकाराच्या पिशव्या, बॅगा होत्या. याचवेळी उलट दिशेने दुसरी लोकल भरधाव वेगात जात होती. त्या ट्रेनच्या धक्क्यामुळे प्रवाशांच्या बॅगा एक-मेकांवर आदळल्या आणि एकामागून एक तब्बल १३ प्रवासी ट्रेनमधून खाली फेकले गेले. पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. लोकल ट्रेनमधील जीवघेणी गर्दी ही नवीन गोष्ट नाही. पण दररोज अशा परिस्थितीत प्रवासी जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत, हे पाहूनही प्रशासन शांत का आहे? दरवाजांवर लटकून प्रवास करणं हे काहींच्या मते प्रवाशांचं चूक आहे. पण जर डब्यांमध्ये जागाच नसेल, तर प्रवासी काय करणार? तसेच अशा गर्दीच्या वेळेस विरुद्ध दिशेने जाणाऱ्या लोकलचे अंतर इतके कमी ठेवणे, हे केवळ तांत्रिक चुकीचं नव्हे, तर अत्यंत निष्काळजी आणि धोकादायक नियोजन आहे. रेल्वे यंत्रणा आधुनिक डिजिटल व्यवस्थेने युक्त असूनदेखील प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे एवढे दुर्लक्ष का? या अपघातानंतर नेहमीप्रमाणे 'शोक व्यक्त', 'तपास सुरू', 'प्रशासनाने चौकशी सुरू केली आहे' अशा घोषणा केल्या जात आहेत. मुख्यमंत्री निधीमधून मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्यात येणार आहे, परंतु यामुळे गेलेल्या व्यक्ती परत येतील का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या घटनेच्या मागे कोण दोषी आहे? आणि त्याला शिक्षा कधी होणार? हे प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत. यंत्रणेमधील दोषी अधिकारी, नियोजनातील गोंधळ करणारे यंत्रणाधिकारी आणि देखरेखीसाठी जबाबदार अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कठोर शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे. जोपर्यंत वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कार्यवाही होत नाही तोपर्यंत कितीही प्रवासी मृत्युमुखी पडले तरी त्यांना त्याचे काही दुःख वाटणार नाही, याचा प्रत्यय आपल्याला अनेक ठिकाणी येतो. केवळ लोकल रेल्वेस नव्हे तरी अन्य ठिकाणी होणाऱ्या घटनांमध्ये असेच दिसून आले आहे. अशा प्रकारचे अपघात टाळण्यासाठी काही ठोस उपाय करता येतील. ही घटना केवळ शोकांतिकेपुरती मर्यादित राहता कामा नये. रेल्वे प्रशासनाने स्वयंचलित दरवाजे, मेट्रोप्रमाणे स्वयंचलित दरवाजे बसविण्याची घोषणा केली आहे. पण याला देखील विरोध होतो आहे. कारण अत्यंत जास्त गर्दी असल्यानंतर उघडे दरवाजातून प्रवास करणाऱ्या व्यक्तींना आपोआप बंद होणाऱ्या दरवाजामुळे शक्य होणार नाही. तसेच प्रचंड गर्दीमुळे पुरेशी हवा मिळणार नाही आणि यामुळे गुदमरून लोकांचा मृत्यू होऊ शकतो. अशी भीती काहीजणांनी व्यक्त केली आहे आणि ती खरी आहे. असे करण्याऐवजी प्रत्येक लोकल रेल्वेसाठी डब्यांची संख्या वाढवणे अत्यंत गरजेचे झाले आहे. गर्दीच्या वेळेस विशेष डब्यांची व्यवस्था करून प्रवाशांचा दाटपणा कमी कमी करता येण्यासारखा आहे. वेळापत्रक पुनर्रचना करून गर्दीच्या मार्गावर जास्त लोकल चालवून गर्दीची वाटणी केली गेली पाहिजे. त्याचप्रमाणे प्रवासी व्यवस्थापन करण्यासाठी प्रत्येक स्थानकांवर अधिक लोकसंख्येसाठी नियोजनबद्ध लायनिंग आणि प्रवासी मार्गदर्शन करणारे स्वयंसेवक नेमणे देखील तेवढेच गरजेचे आहे. आधुनिक तांत्रिक सुरक्षितता प्रणाली लागू करून दोन ट्रेन जवळ आल्यावर अलर्ट देणारी यंत्रणा सुरू करणे आता गरजेचे झाले आहे. सर्वच उपाय हे कायमस्वरूपी असले पाहिजेत. अन्यथा आपल्याकडे सवय आहे की एखादा अपघात झाला की काहीतरी घोषणा केली जाते आणि पुढे सगळं सोयीस्करपणे विसरल्या जातं. कायमस्वरूपी उपायांमध्ये नवीन मार्गांवर द्रुतगती सेवा, डेडिकेटेड महिला व प्रौढांसाठी गाड्या यासारख्या संकल्पना अंमलात आणाव्यात. कारण असे करणे हे केवळ रेल्वे प्रशासनाचे कर्तव्य नव्हे तर माणुसकीच्या दृष्टिकोनातून तो त्यांचा धर्मही आहे, याचा विसर त्यांना पडू नये. कोणत्याही परिस्थितीत गलेलठ्ठ पगार घेणाऱ्या अधिकाऱ्यांना माणुसकीचा विसर पडू नये. या घटनेत मृत्युमुखी पडलेले पाच जण आणि त्यांच्या मागे राहिलेल्या कुटुंबियांचा विचार करता मन विषण्ण होते. त्यांचे अपुरे स्वप्न, अपूर्ण राहिलेली जबाबदारी आणि शोकमग्न कुटुंब यांना शासनाने तात्काळ मदत करावी. तसेच अधिक गरज आहे ती जबाबदारीची आणि उपायांची. मुंबईसारख्या महानगरात सार्वजनिक वाहतुकीची शिस्त आणि सुरक्षितता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नाही, ती एक सामाजिक जबाबदारी आहे. पण यामध्ये प्रथम जबाबदारी आहे ती रेल्वे प्रशासनाची. जर हेच प्रशासन प्रवाशांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करत असेल, तर हा केवळ अपघात नाही, हा गैरव्यवस्थेचा गुन्हा आहे. मुंब्रा-दिवा दुर्घटना ही चेतावणी आहे. यावर आता फक्त चौकशी करून वेळ मारून नेण्याचा प्रकार नको. दोषींवर कडक कारवाई, दीर्घकालीन उपाय, तांत्रिक सुधारणा आणि प्रशासनातील जबाबदारीची पुनर्रचना ही काळाची गरज आहे. प्रत्येक प्रवाशाचा प्राण महत्त्वाचा आहे. प्रवाशांनी देखील आपली जबाबदारी ओळखून प्रवास करावा. प्रवास करताना कमीत कमी सामान असावे आणि शक्यतोवर लटकून प्रवास करू नये. रेल्वे प्रशासन जर सार्वजनिक यंत्रणा हे समजून घेत नसेल, तर भविष्यातील दुर्घटना रोखणे अशक्य होईल. वेळ आली आहे की, रेल्वे प्रशासनाला जागं केलं जावं, नाहीतर आणखी जीव गमवावे लागतील.

# जागतिक दृष्टीदानावर बोलू काही!



सबंध जगभर १० जून हा दिवस जागतिक दृष्टीदान दिन म्हणून साजरा केला जातो. शासकीय सेवेत राहून नेत्रसेवा हिच ईश्वर सेवा म्हणून अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमय करणारे उस्मानाबाद जिल्ह्याचे भूमिपुत्र डॉ. भालचंद्र रामचंद्र लक्ष्मणराव १० जून १९२४ रोजी उदयास आले व १० जून १९७९ रोजी या दीपस्तंभाची ज्योत हृदयविकारसारख्या आजाराने मावळली. काळोखातून प्रकाशात अंधांना स्थलांतरीत करणारे दृष्टीहीन व्यक्तींच्या अंधकारमय आयुष्यात दृष्टीचा प्रकाश देणारे महान डॉ. भालचंद्र रामचंद्र लक्ष्मणराव यांचे स्मृतीप्रीत्यर्थ व जागतिक दृष्टीदान दिन म्हणून साजरा केला जातो.

कलियुगात दानाला फार महत्त्व आहे. अवयवदान, रक्तदान, नेत्रदान यांचे विशेष महत्त्व वैज्ञानिकदृष्ट्या काळाची गरज आहे.

महाराष्ट्रात सुमारे ९ लाखांपेक्षा जास्त गरजू अंध व्यक्ती आहेत. ज्यांना नेत्रदानामुळे पुनरदृष्टी प्राप्त होऊ शकते. ज्या अंध लोकांना बुबुभाच्या विकारामुळे अंधत्त्व आलेले आहे त्यांना नेत्रदानाचे फार मोठे उपयोग होतात, यालाच कॉर्निअल ब्लाईड असे म्हणतात. नेत्रदानानंतर केवळ डोळ्याच्या बुबुभाचे प्रत्यारोपण केले जाते.

लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वच लोक नेत्रदान करू शकतात. ज्यांना चष्मा आहे, मोतीबिंदूचे ऑपरेशन झालेले आहे असे लोकसुद्धा नेत्रदान करू शकतात. फक्त मृत्यू जर रेबीन, कावीळ, कॅन्सर, धनुर्वात किंवा एड्स या रोगामुळे झाला असेल तरच त्याचे नेत्रदान होऊ शकत नाही. साध्या संकल्प पत्रावर सही करून जवळच्या नेत्र पेढीला देऊन नेत्रदानाचा संकल्प करू शकतो. नेत्रदान हे मृत्यूंतर ६ तासांच्या आत करावे लागते. नेत्रदान करू इच्छिणाऱ्या मृत व्यक्तीस दवाखान्यात नेण्याची गरज नाही. मृत्यूनंतर जवळच्या नेत्रपेढीला फोन करणे, नेत्रतज्ज्ञ घरी येऊन मृत व्यक्तीचे दोन्ही नेत्रपटल (कॉर्निया) काढून घेतात व मृत व्यक्तींच्या रक्ताचा नमुना पण घेऊन जातात. नंतर ते दोन्ही नेत्रपटल दोन वेगवेगळ्या कॉर्निअल ब्लाईंड असलेल्या व्यक्तीला रोपण करतात. नेत्रदानाने आपला चेहर विद्रुप होत नाही. फक्त मृत व्यक्तीच्या खोलीतील पंखा बंद ठेवणे, मृत व्यक्तीच्या डोळ्यावर ओल्या कापडाची पट्टी किंवा कापसाचे बोळे ठेवणे, मृत व्यकतीच्या डोळ्यावर ओल्या कापडाची पट्टी किंवा कापसाचे बोळे ठेवणे, डोक्याखालील पातळ उशी ठेवणे व मृतकाचे मृत्यू प्रमाणपत्र बनवून ठेवणे एवढे गरजेचे आहे.

अंधत्त्व येण्यामध्ये सर्वात मोठे कारण म्हणजेच मोतीबिंदू

मोतीबिंदमुळे आलेले अंधत्त्व शंभर टक्के शस्त्रक्रियेने परत मिळवता येते. काचबिंदूमुळे येणारे अंधत्त्व योग्यवेळी उपचार व शस्त्रक्रिया केल्यास पुढे होणाऱ्या दृष्टीच्या अनर्थास टाळता येते. परंतु काचबिंदूमुळे जेवढी दृष्टी कमी झाली ती वापस मिळवता येत नाही. चष्म्याचा दृष्टीदोष असल्यास योग्य नंबरचा चष्मा वापरून नजरेचा उपयोग घेता येतो. रेटीना किंवा मागच्या पडद्यावर बिघाड होऊन दृष्टीवर परिणाम झाल्यास विशेष नेत्रतज्ज्ञांच्या प्रयत्नाने योग्य वेळी उपचार करून अंधत्वास आळा घालता येतो. परंतु बुबुळाच्या बिघाडामुळे अपार दर्शकामुळे आलेले अंधत्त्व दूर करण्यासाठी फक्त नेत्रदानाचे बुबुळ रोपणानेच शक्य आहे, म्हणून हे नेत्रदान श्रेष्ठ दान ठरले.

डोळ्यांना शरीरात विशेष महत्त्व आहे. जगातील सात आश्चर्य बघायला डोळेच हवेत. ज्या डोळ्यांनी बाह्य जग पाहतोत त्याच डोळ्यांतून आंतरजगत व्यक्त होते.

मानवी डोळ्यांची रचना लक्षात घेतल्यास हाताच्या घड्याळावर जशी पारदर्शक काच असते तशी डोळ्यांच्या परितारिकेवर बुब्बुळ म्हणजेच Cornea असते. हे पारदर्शक बुब्बुळ जंतुसंसर्ग किवा मार लागून दुखापत झाल्यास अपारदर्शक बनते व अंधत्त्व येऊ शकते. जो नेत्रदाता मृत्यूनंतर नेत्रदान करतो त्याचे पारदर्शक बुब्बुळ काढून अंध व्यक्तीच्या अपारदर्शक बुब्बुळाचे ठिकाणी रोपण केले जाते. यालाच नेत्ररोपण असे म्हणतात व नेत्रदान करणाऱ्या मृत व्यक्तीला नेत्रदाता (नेत्रदान) म्हणतात. समाजामध्ये नेत्रदान करणारे नेत्रदाते जसे जसे पुढे येतील तसे तसे Cornea मुळे येणारे अंधत्त्व कमी होत जाईल हे अंधत्त्व फक्त आणि फक्त नेत्रदानानेच कमी करता येते, कारण जगात बुब्बुळ Cornea तयार करणारे दुसरे माध्यम सध्यातरी अवगत झालेले नाही.

म्हणूनच नेत्रदानाचा संकल्प करा,
मृत्यूनंतर मृत्युंजय बना!

अनंताच्या पत्नीकडे जाऊनही अस्तित्त्व करावे, तुमच्या डोळ्यांतूनही कुणी तसे जग पाहावं.

**-डॉ. एल. जी. चंदनकर**
नेत्रचिकित्सा अधिकारी,
जिल्हा रुग्णालय, नांदेड

# रोजगार निर्मितीचे दीपस्तंभ उद्योजक बालाजी कंठेवाड!



मुदखेड तालुक्यातील कोल्हा गावचे भूमिपुत्र वीज वितरण मंडळात आपल्या शासकीय सेवेची सुरुवात करतात. 'जनमित्र' या पदावर कार्यरत असताना त्यांना उद्योजकतेची ओढ लागायला लागली. अंगी असलेली प्रचंड विनम्रता, मनमिळाऊ स्वभाव, व्यावसायिक गुणसूत्रे आणि माणूस माणसाशी जोडण्याची असलेली कला या स्वभावातून त्यांच्या मनात निर्माण झालेले उद्योजकतेचे स्वप्न आजच्या २० एक वर्षापूर्वी खऱ्या अर्थाने जमीन स्तरावर साकार व्हायला लागले. या माध्यमातून 'श्रवण इलेक्ट्रिकल प्रायव्हेट लिमिटेड' उद्योग समूहाची उभारणी केली. या माध्यमातून बालाजी कंठेवाड यांनी उद्योजकता क्षेत्रात आपले पाऊल टाकले. अर्थशास्त्रात म्हटले जाते धोका पत्करण्याचा मोबदला म्हणजे नफा असतो आणि हेच सूत्र गृहीत धरून उद्योजकता क्षेत्रातील धोका त्यांनी पत्करला.

सर्वप्रथम त्यांनी रोहित्री निर्मितीचा उद्योग नांदेड जिल्ह्यात उभा केला. या माध्यमातून नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर या जिल्ह्यात त्यांनी रोहित्री पुरवण्याचे काम सुरू केले. त्याचबरोबर रोहित्री व वीज क्षेत्राला लागणारी सर्व इलेक्ट्रिकल साहित्य निर्मितीचेही उद्योग उभे केले. जवळपास चारशेहून अधिक कर्मचाऱ्यांना यामधून रोजगार मिळाला आहे. आज जवळपास चारशे कुटुंबांना उदरनिर्वाह कंठेवाड यांच्या दूरदृष्टीतून प्राप्त झाला आहे. उद्योजकता क्षेत्रातील त्यांचे यशस्वी पाऊल जिल्ह्याच्या औद्योगिक विकासात मोलाची भर घालणारी बाब ठरली आहे. बालाजी कंठेवाड हे भोकर, अर्धापूर, हिमायतनगर, किनवट येथील शासकीय प्रशिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्षही आहेत. त्यामुळे औद्योगिक शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे मोलाचे कार्य सुरु आहे.

सन २०२०-२१ चा काळ म्हणजे देशातील कोरोनाचा भयग्रस्त काळ होता. यावेळी बालाजी कंठेवाड यांनी नांदेड जिल्ह्याच्या एमआयडीसी विभागात स्वतः चा ऑक्सिजन प्लांट उभा केला. कोरोनाच्या काळात रुग्णांना सर्वात जास्त ऑक्सिजनची गरज होती. त्यावेळी देशात सर्वात मोठी समस्या म्हणजे ऑक्सिजनचा तुटवडा होता. अशा विपरीत परिस्थितीत, आणि कोरोना सारख्या घोर संकटाच्या काळात ऑक्सीजन प्लांट निर्मितीचा बालाजी कंठेवाड यांनी घेतलेला निर्णय मैलाचा दगड ठरला. त्यांच्या ऑक्सिजन प्लांटमुळे सबंध मराठवाड्यातील कोरोना रुग्णांना अगदी वेळेवर ऑक्सिजन मिळायला लागला. त्यामुळे अनेकांचे प्राण वाचविण्यात आले. बालाजी कंठेवाड यांची दूरदृष्टी आज शेकडो कुटुंबांना रोजगार मिळवून देते आणि त्याचबरोबर जिल्ह्याच्या औद्योगिक विकासात मोलाची भर घालते. रोहित्री निर्मितीचा त्यांचा कारखाना असो की, ऑक्सीजन प्लांटची उभारणी असो या दोन्ही गोष्टीमुळे नांदेड जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक विकासात कंठेवाड यांचा महत्त्वपूर्ण वाटा राहिला आहे, असेच म्हणावे लागेल.

बालाजी कंठेवाड यांनी केवळ कर्मचाऱ्यांना नोकरीच उपलब्ध करून दिली नाही तर, त्यांचा एक परिवार सांभाळ करण्याचा मानस व्यक्त केला आहे. या कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक सुखात आणि दुःखातही कंठेवाड यांचा सहभाग असतो. त्यामुळे कंठेवाड यांच्यासाठी प्रत्येक कर्मचारी हा पारिवारिक सदस्य झाला आहे. आज नांदेड जिल्ह्यात रोजगार निर्मितीचे दीपस्तंभ ठरलेल्या 'बालाजी कंठेवाड' यांचा ५६ व्या वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.

**- एक हितचिंतक**

# वकीली व्यवसायात सुवर्ण वाटचाल करणारे अॅड. पी. एन. शिंदे



आज अॅड. पी. एन. शिंदे यांचा वाढदिवस. या विशेष दिवशी त्यांचे कायदा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान आणि ४८ वर्षांची यशस्वी कारकीर्द स्मरणात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी वकिली व्यवसायात दाखल झाल्यापासून निःस्वार्थ सेवा, नैतिकतेची निष्ठा आणि कायद्याविषयीची सखोल जाण यामुळे आपले वेगळे स्थान निर्माण केले. आज ते वकीलीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे आत्मविश्वासाने वाटचाल करत आहेत ही केवळ त्यांच्या कार्यक्षमतेची नव्हे, तर कायदा क्षेत्रावरील त्यांच्या दृढ श्रद्धेची जिवंत साक्ष आहे.

अॅड. पी. एन. शिंदे यांनी कायदा क्षेत्रात स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. त्यांनी अनेक गुन्हेगारी आणि दिवाणी आणि कौटुंबीक प्रकरणांमध्ये न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आपल्या मेहनतीच्या आणि अभ्यासाच्या जोरावर त्यांनी न्यायपालिकेत स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. म्हणून त्यांना न्यायासाठी लढणारा एक निष्ठावान वकील असे संबोधले जाते. शिंदे सरांनी अनेक मोठ्या आणि जटिल प्रकरणांमध्ये महत्त्वपूर्ण निकाल मिळवले आहेत. त्यांनी केलेल्या कार्यामुळे अनेक सामान्य लोकांना न्याय मिळाला आहे. त्यांच्या कार्यामुळे कायदा क्षेत्रातील अनेक नवोदितांना प्रेरणा मिळाली आहे. नांदेड-मधील पहिल्या तिहेरी खून खटल्यात म्हणजे सोनी मर्डर केसमध्ये ते उदयास आले. शेवडी बाजीराव खून खटल्यात अॅड. उज्वल निकम यांच्या मुकाबल्यात २४ आरोपींची निर्दोष सुटका केल्यानंतर या व्यवसायात त्यांनी आपला जम बसवला.

अॅड. शिंदे यांच्या प्रवासात अनेक अडथळे आले, पण त्यांनी कधीही हार मानली नाही. आपल्या मेहनतीच्या आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर त्यांनी प्रचंड यश मिळवलं आहे. त्यांच्या संघर्षातून कायदा क्षेत्रातील नवोदितांना खूप काही शिकता येऊ शकतं. त्यांच्यासोबत काम करणाऱ्या ज्युनियर व ज्युनियरचे ज्युनियर वकीलांची संख्या १०० वर गेली आहे. त्यांच्याकडे काम करणारे अनेक वकील न्यायाधीश झाले असून, विजय कुलकर्णी आणि बी. एन. कदम हे त्यांचे ज्युनियर जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचे आणखी तीन ज्युनियर जिल्हा व सत्र न्यायाधीश या पदावर कार्यरत आहेत. यासह शिंदे सरांनी अनेक शासकीय अधिकारी घडवले आहेत.

त्यांनी फक्त वकिली व्यवसायापुरतं मर्यादित राहून काम केलं नाही, तर समाजासाठीही मोठं योगदान दिलं आहे. त्यांनी अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये भाग घेतला असून गरजू लोकांसाठी मोफत कायदेशीर सेवा पुरवली आहे.

अॅड. पी. एन. शिंदे हे कायदा क्षेत्रातील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी आपल्या कठोर परिश्रमाने आणि निःस्वार्थ सेवेने समाजात आदर मिळवला आहे. आपल्या मेहनतीच्या आणि सचोटीच्या बळावर त्यांनी वकिली व्यवसायात वेगळं स्थान निर्माण केलं. त्यांचा अभ्यासपूर्ण युक्तिवाद आणि उलट तपासणीमुळे ते लवकरच न्यायालयात प्रसिध्द झाले. आक्रमकता हा त्यांचा स्थायीभाव ठरला. त्यांच्या सखोल ज्ञानामुळे आणि न्यायप्रेमी वृत्तीमुळे अनेक सामान्य लोकांना न्याय मिळाला. त्यांनी आपली वकिली फक्त व्यवसाय म्हणून न करता समाजसेवेचा भाग म्हणूनही पाहिली. वकीली व्यवसायाशिवाय त्यांनी इतरत्र वेळ खर्च करणे प्रकर्षाने टाळले. त्यांचे तर्कशुद्ध विचार आणि कायद्याचे सखोल ज्ञान यामुळे ते केवळ जिल्हा न्यायालयातच नव्हे, तर उच्च न्यायालयातही आदराने पाहिले जातात. त्यांच्या कौशल्यामुळे आणि निपुणतेमुळे न्याय मिळवून देण्याच्या प्रक्रियेत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

२०१६ साली त्यांना महात्मा ज्योतीबा फुले शिक्षक परिषद या संघटनेच्या वतीने कायदेरत्न हा राज्यस्तरीय नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. २०१७ साली विधी क्षेत्रात कामगिरी केल्याबाबत राजमाता माँ जिजाऊ पुरस्कार देण्यात आला. वकीली व्यवसायातील त्यांच्या उत्कृष्ट सेवेची दखल थेट बार कौन्सिल ऑफ तथा बार कौन्सिल ऑफ इंडीयाने घेतली. १४ एप्रिल २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मा. अभय ओक, ज्येष्ठ मंत्री एकनाथ शिंदे, बार कौन्सिल ऑफ इंडीया नवी दिल्लीचे अध्यक्ष सनतकुमार मिश्रा आणि महाराष्ट्राचे सॉलिसीटर ए. ए. कुंभकोणी आदी दिग्गजांच्या उपस्थितीत त्यांना अभियोक्ता संघातील दीपस्तंभ सिनीअर लॉयर हा सर्वोच्च पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी पुरस्कार न्यायमूर्ती खोब्रागडे यांच्या हस्ते त्यांना देण्यात आला.

अॅड. शिंदे यांचे कुटुंबही कायदा क्षेत्रात अग्रेसर आहे. त्यांच्या पुढील पिढ्यांनीही त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत वकिली व्यवसायात मोठे योगदान दिले आहे. त्यांचे पुत्र अॅड. विक्रमराजे शिंदे हेही यशस्वी वकील आहेत. यामुळे त्यांच्या कुटुंबाने कायदा क्षेत्रात एक ठळक ओळख निर्माण केली आहे. अॅड. विक्रमराजे यांचे शालेय शिक्षण शांतीनिकेतन स्कूल हैदराबाद, नाथ व्हॅली स्कूल छ. संभाजीनगर आणि एलएलबीचे शिक्षण आयएस कॉलेज पुणे येथे झाले. कदाचित त्यामुळे आपली पहिली केस खून खटला प्रकरण भोकर न्यायालयात चालविली आणि जिंकली देखील. आपल्या वडीलांचा वारसा ते समर्थपणे चालवतील हे त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने दाखवून दिले.

**अॅड. सुजाता बगाटे**
प्रभातनगर, नांदेड

# रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानणाऱ्या डॉ. सौ. पूजा गायकवाड



गेल्या बेचाळीस वर्षापासून देगलूर येथे डॉ. जी. ए. गायकवाड हे गायकवाड हॉस्पिटलच्या माध्यमातून नांदेड या जिल्ह्याच्या ठिकाणी न जाता देगलूर येथेच राहून अनेक गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा देऊन व्याधी मुक्त करण्याचे केले आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून डॉ. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या मोठ्या सुनबाई डॉ. पूजा सचिन गायकवाड ह्याही परंपरा पुढे चालवीत आहेत.

महाराष्ट्र राज्यातील उद्योग क्षेत्रात अतिशय प्रतिष्ठित व मानाचा समजला जाणारा महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार २०२५ हा डॉ. पूजा सचिन गायकवाड (मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल देगलूर जिल्हा नांदेड) यांना सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते नुकताच नाशिक येथील एका कार्यक्रमात देण्यात आला.

डॉ. पूजा गायकवाड यांनी एन.के.पी. साळवे मेडिकल कॉलेज नागपूर येथून २००८ साली एम. बी. बी.एस. पूर्ण केले . २००९ साली डॉ. पूजा यांचे लग्न डॉ. सचिन गुंडेराव गायकवाड (एम. बी. बी. एस., डी. ऑर्थो) यांच्या सोबत झाले. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, पिंपरी चिंचवड पुणे येथून २०१२ साली डी. जी. ओ.पूर्ण केले. डॉ. जी. ए. गायकवाड सुप्रसिद्ध शल्यचिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली २०१२ पासून देगलूर येथे प्रसूती व स्त्री रोग चिकित्सक म्हणून वैद्यकीय व्यवसाय अतिशय व्यवस्थितपणे सांभाळत आहेत.

डॉ. पूजा गायकवाड यांचे प्राथमिक शिक्षण केंद्रीय विद्यालय आऊध निर्मानी चांदा येथे झाले. आई डॉ. सौ. माला प्रेमचंद (एम. बी.बी.एस.), वडील डॉ. बी. प्रेमचंद (एम.बी.बी.एस., डी.जी.ओ.) उच्च शिक्षित वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर म्हणून गेल्या ३५ वर्षांपासून भद्रावती येथे वैद्यकीय सेवा देत आहेत. भाऊ डॉ.अमीत प्रेमचंद (एम. बी. बी. एस., एम. डी.) असून ते शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर येथे डीन म्हणून कार्यरत आहेत. देगलूर येथे रुग्णांसाठी सुसज्ज शस्त्रक्रियागृह व सुसज्ज सर्जिकल आयसीयु आहे. आगीपासून सुरक्षा मिळावी यासाठी रुग्णालयात फायर लाईन आहे. ईतर तालुकास्तरावर नसणारे लॅमिनार फ्लो मशीन जे ऑपरेशन थियटरमधील तापमान नियंत्रित ठेवते. तसेच ऑपरेशन थियटर स्वच्छ व निर्जंतुक ठेवते. हे मशीन ऑपरेशन थियटरमध्ये कार्यान्वित आहे. जे रुग्णांना सुरक्षित सेवा देण्यासाठी अतिशय मोलाचे कार्य करते. दुःखात, त्रासात आलेला रुग्ण आपल्या उपचाराने बरा होऊन समाधानाने घरी परत जावा, गोरगरिबांना दिलासा मिळावा, त्यांचे जीवन व्याधीमुक्त होऊन त्यांना समाधान मिळावे, अशी वैद्यकीय सेवा द्यावी अशी शिकवण सासरे डॉ. जी. ए. गायकवाड व वडील डॉ. बी. प्रेमचंद यांनी दिली आहे. याची जाणीव ठेवून डॉ. पूजा गायकवाड ह्या अहोरात्र रुग्ण सेवेत राहतात. या काळात अनेक आव्हानात्मक, गंभीर रुग्ण रात्री बेरात्री येतात. अशीच एक गंभीर महिला रुग्ण बाळंतपणा पश्चात अतिरक्तस्त्राव होऊन रक्तदाब खूप कमी झालेला रुग्ण शॉकमध्ये होता. त्याला उच्च केंद्रावर जाणे वेळेअभावी धोक्याचे होते. अशा परिस्थितीमध्ये त्या महिला रुग्णावर आवश्यक ते उपचार वेळेत दिल्यामुळे बाळंतीण व बाळ दोघेही सुखरूप राहिले. असे अनेक रुग्ण बरे करणं यातच मोठं समाधान आहे. रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा आहे याची प्रचिती येऊन समाधान मिळत असल्याचे डॉ. पूजा यांनी सांगितले.

लग्नाआधी मुलगा व मुलीने प्री जेणेटिक कौन्सिलिंग दोघांनीही करून घ्यावे. जेणेकरून नंतर जन्माला येणारे बाळ सुस्थितीत व सुरक्षित जन्म घेते. वधू-वर दोन्ही पक्षाकडील मंडळींनी मुला मुलीकडे त्यासाठी आग्रह करावा. व प्री जेनेटिक एनालिसिस सोबतच आवश्यक त्या सर्व तपासण्या कराव्या ज्यामुळे अनेक घातक बाबी वर नियंत्रण येईल. लग्ना नंतर बाळंतपणात आर्थिक मदत मिळावी या करिता हेल्थ इन्शुरन्स करा जेणे करून महिलांना फायदा होईल. अशा महत्वाच्या धोरणातून महिला सशक्त व्हाव्यात, घर संसारा सोबत अनेक व्यवसाय, कला, पर्यावरण, संस्कृती, क्रीडा, नृत्य, गायन आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य महिलांनी करावे अशी कार्य प्रणाली कार्यान्वित करण्याची मनीषा डॉ. पूजा गायकवाड यांनी व्यक्त केली.

महिला आत्मनिर्भर व्हाव्यात , त्याना स्व: संरक्षण करता यावे याबद्दल उपक्रम राबवण्याची संकल्पना असल्याचे डॉ. पूजा गायकवाड यांनी सांगितले. गेल्या १५ वर्षा पासुन अंध विद्यार्थ्यांना गणवेश, भोजन, शैक्षणिक साहित्य आदी देऊन सहकार्य करत आहेत . स्वच्छता मोहीम , ब्रुक्षारोपण मोहीम मधे सक्रिय सहभाग घेत असतात . शहर व परिसरात आयोजित अनेक आरोग्य तपासणी शिबिरामध्ये त्यांनी सहभाग घेऊन रुग्णांची सेवा केली आहे. डॉ. पूजा गायकवाड यांचे सासरे डॉ. जी. ए. गायकवाड यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्त त्यांना उदंड आयुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना व वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**-डॉ. सुनील जाधव**
शहराध्यक्ष संभाजी ब्रिगेड, देगलूर

# १४ जूनपर्यंत तापमानात वाढ आणि काही ठिकाणीच मेघ गर्जनेसह पाऊस

## शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये



**मुंबई**-गेल्या जवळपास दोन आठवड्यापासून राज्यातील मान्सूनचा प्रवास पूर्णपणे रखडला आहे, आणि किमान १५ जूनपर्यंत तरी तो रखडलेलाच राहणार आहे. यामुळे १४ जूनपर्यंत पश्चिम किनारपट्टी वगळता राज्यातील विविध भागांमधील तापमानात वाढ होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, आणि खानदेशातील कमाल तापमान अधिक राहण्याचा अंदाज आहे. या दरम्यान पूर्व विदर्भात कमाल तापमानात अजून वाढ होऊन ते ४५ अंशापर्यंत जाण्याचा अंदाज आहे, तर विदर्भातील बऱ्याच भागात कमाल तापमान ४० अंशापेक्षा अधिक राहणार असल्याचा अंदाज आहे. मराठवाडा आणि खानदेशातील अनेक भागात कमाल तापमान ४० अंशाच्या आसपास राहण्याचा अंदाज देखील आहे.

१४ जूनपर्यंत राज्यात सार्वत्रिक आणि मान्सूनचा पाऊस अपेक्षित नाही. पाऊस हा प्रामुख्याने दुपार नंतर आणि मेघ गर्जनेसह काही भागातच पडेल, ज्याची शक्यता या आठवड्याच्या सुरुवातीला दक्षिण मराठवाडा आणि दक्षिण मध्य-महाराष्ट्रात अधिक राहील. तुलनेत राज्यातील इतर भागात विखुरलेल्या स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे.

या दरम्यान कमाल तापमान अधिक राहणार असल्यामुळे आणि सार्वत्रिक मान्सूनचा पाऊस अपेक्षित नसल्यामुळे शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## थोडक्यात...

### गुरुवारी बांधकाम व घरेलू कामगारांचा मोर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)–** इमारत व बांधकाम कामगार तसेच घरेलू कामगारांच्या विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर गुरुवारी (दि.१२) आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीटू) आणि प्रगती महिला पुरुष बांधकाम संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. विविध योजनांचा व भांडे वाटपाचा लाभ मिळेपर्यंत संघर्ष करण्यात येणार असून बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या प्रवृत्ती विरोधात जोरदार आवाज उठवून भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे.

मोर्चात मोठ्या संख्येने सामील होण्याचे आवाहन सीटू चे जनरल सेक्रेटरी कॉ. गंगाधर गायकवाड आणि प्रगती महिला पुरुष बांधकाम संघटनेचे सचिव अब्दुल वसीम अब्दुल सलीम यांनी केले आहे.

### एमजीएम महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिवस साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात ३५१ वा शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. संचालिका डॉ.गीता लाठकर आणि उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे यांनी ९ जून रोजी सकाळी छत्रपतींना अभिवादन केले. यावेळी महाविद्यालयातील विविध विभागप्रमुख डॉ. महेश हरकरे, प्रोफेसर हाश्मी, डॉ. दीपक पत्तेवार, डॉ.गोविंद हंबर्डे, प्रा. विठ्ठल जाधव, प्रा. गिरिश देशमुख, डॉ. विवेक कुडे आदींसह अनेक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ज्ञानोबा शिंदे आणि राजेगोरे यांनी परिश्रम घेतले.

# अवास्तव खर्च टाळा अन् मोजक्या लोकांमध्येच लग्न लावा

## सकल मराठा समाजाची आचारसंहिता जारी



**नांदेड (प्रतिनिधी)–** दोनशे लोकांत लग्न लावा. मुला मुलींच्या लग्नात खर्च-बडेजाव टाळा, लग्नमंडपाचे राजकीय व्यासपीठ बनवू नका, कुंडलीऐवजी मुला-मुलींचे कर्तृत्व पाहा, अशी आचारसंहिताच सकल मराठा समाजाने तयार केली आहे.

मराठा समाजातील लग्न समारंभाची सर्वमान्य आचारसंहिता ठरवण्यासाठी सकल मराठा समाजाची सामूहिक बैठक शहरातील सोमवारी (दि.९) विजयनगरच्या हनुमान मंगल कार्यालय आयोजित करण्यात आली होती.. मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार अध्यक्षस्थानी होते.

अवास्तव खर्चाला फाटा देत 'दोनशे लोकांत लग्न लावा' असा एकमुखी ठरावच पारित करण्यात आला. वैष्णवी हगवणे या मराठा समाजातील विवाहित तरुणीने सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली. तिच्या वडिलांनी शाही थाटात विवाह लावला. सगळी धर्मकार्ये झाली. पण, या सगळ्या गोष्टी तिचा संसार नीट करू शकल्या नाहीत. हुंडा, कुंडली, ज्योतिष, मंगलाष्टके, वऱ्हाडी, अक्षता हे कुणीही तिला वाचवू शकले नाही. पैसे उधळले, धर्मसोपस्कार केले, म्हणजेच लग्न टिकेल ही अंधश्रद्धा आहे, हे लोकांना कळले. असे मत व्यक्त करत उपस्थित प्रतिनिधींनी आपल्या भावना प्रकट केल्या.

लग्न समारंभाची सर्वमान्य आचारसंहिता ठरवण्यात आली असून या आचारसंहितेची सकल मराठा समाजा ने अमलबजावणी करावी असे आवाहन करण्यात आले. या आचारसंहितेची अमलबजावणी करण्यासाठी सुकानु समिती स्थापन करण्यात आली. या समिती मध्ये सोपानराव क्षीरसागर, मधूकर महाराज बारुळकर, विठ्ठल बनबरे, तानाजी हुस्सेकर, अवधुत पवार, संतोष गव्हाने, सुचिता जोगदंड, कल्पना पाटील, माधवराव देवसरकर, पंजाबराव काळे, गिरीष जाधव, पंडित कदम, रमेश पवार, जनार्धन शेजुळे, प्रवीण जाधव, पंढरीनाथ बोकारे यांचा समावेश आहे.

डीजे वर बंदी घालणे, पारंपरिक वाद्य वाजवणारे लोक कलावंतांना प्रोस्थान देणे, प्री- वेडिंगमधून बिबित्स प्रकार दाखवू नये, नवरा-नवरीला हार घालताना वर उचलून घेऊ नये. कर्ज काढून लग्नात खर्च करु नये. नवरदेवापुढे, वरातीत दारू पिऊन नाचणाऱ्या तरुण-तरुणींना पायबंद घालावा. लग्नात फक्त वधूपिता आणि वरपिता यांनीच फेटे बांधावेत. लग्नात छ. शिवाजी महाराजांची आरती बंद करावी. आणि जिजाऊ वंदना घ्यावी. भेटवस्तूऐवजी पुस्तके, झाडाची रोपे भेट द्यावी. देखावा करू नये, लग्नात हुंडा - घेऊ नये, जेवणात पाचपेक्षा जास्त अन्न पदार्थ ठेवू नये. लग्न साखरपुडा हळद एकाच दिवशी करावा, अशी लग्न अचारसहिता तयार करण्यात आली आहे.

# भाजपा सिडको मंडळात विश्व पर्यावरण दिवस साजरा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक पर्यावरण दिनाच्या औचित्याने व पंतप्रधान मोदींच्या यशस्वी कारकिर्दीला ११ वर्ष पूर्ण होत आहेत. या निमित्ताने भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष अमर राजूरकर यांच्या उपस्थितीत व सिडको मंडळाध्यक्ष सचिन रावका यांच्या नेतृत्वात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परीसरात वृक्षारोपण करून जनजागृती करण्यात आली.

सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळेस महानगर जिल्हाध्यक्ष अमर राजूरकर यांनी पर्यावरणाचे महत्त्व विशद करून प्रदूषणाला आळा घालण्यासाठी वृक्ष संगोपनाचा सल्ला दिला. सिडको मंडळाध्यक्ष सचिन रावका यांनी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी प्लास्टिकचा वापर टाळावा, ओला कचरा इ-वेस्टज घातक वस्तूंचे वर्गीकरण कसे करावे याबद्दल माहिती दिली.

यावेळी भाजपा महानगर अध्यक्ष तथा माजी आमदार अमर राजूरकर, माजी महानगर जिल्हाध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, अभिषेक सौदे, शीतल खांडील, माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, शितल खांडील, संतोष वर्मा, माजी नगरसेवक संजय इंगेवाड, उदय देशमुख, सिध्दार्थ गायकवाड, सतीश बसवदे राजु पाटील काळे, ललिता शिंदे, सिद्धार्थ धूतराज, वैजनाथ देशमुख, चंचलसिंग जट, नीरज चव्हाण, विश्वनाथ जटाळे, सतिश बेरूळकर, नवनाथ कांबळे, विनोद कांचनगिरे, विनायक आकुरगे, मंगेश कदम, भि. ना. गायकवाड, संतोष कांचनगिरे, विशाल गडबे नारायण कौलंबीकर, महेंद्र तरटे, ललिता शिंदे बोकारे, विजया गोडघासे, रेखा आकुरगे, तातेराव पाटील, माधव शिरसाठ यांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जन्म-मृत्यू व विवाह नोंदणीसंदर्भात आरोग्य विभागाच्यावतीने जनजागृतीचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी ही कायद्याने अनिवार्य असलेली प्रक्रिया असून, ती निर्धारित वेळेत व नियमांनुसार पार पडणे अत्यंत आवश्यक आहे. यासंदर्भात आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात दि.९ जून रोजी विशेष बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून नोंदणी प्रक्रियेबाबत जनजागृती वाढविण्याचे आवाहन करण्यात आले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विस्तार अधिकारी, ग्रामीण रुग्णालयांचे नोंदणी कर्मचारी, नगरपालिका व नगरपंचायत प्रतिनिधी, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी जिल्हा सांख्यिकी अधिकारी एम. जी. डुबकवाड व सांख्यिकी अन्वेषक आर. एन. दुधनी यांनी जन्म-मृत्यू नोंदणी प्रक्रियेचे सविस्तर माहिती दिली. यामध्ये आवश्यक कागदपत्रे, कायदेशीर तरतुदी व नोंदणीसाठीची कालमर्यादा याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

जन्म नोंदणीसाठी कायद्यानुसार दहा दिवसांची मुदत असून, कुटुंबप्रमुख यांची जबाबदारी महत्त्वाची आहे. आवश्यक कागदपत्रांमध्ये रुग्णालयाचे डिस्चार्ज प्रमाणपत्र, जन्मदाखला, आईचे ओळखपत्र, अर्जदाराचा अर्ज यांची पडताळणी करूनच नोंदणी करणे आवश्यक आहे. १० दिवसांनंतर व एका वर्षाच्या आत नोंदणीसाठी विशेष अधिकाऱ्याची मान्यता आवश्यक आहे. मृत्यू नोंदणीसाठी नमुना क्र. २ चा वापर होतो. रुग्णालयात मृत्यू झाल्यास फॉर्म ४/४ अ भरावा लागतो.

यावेळी विवाहनोंदणीबाबतही सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रक्रियेबाबत लोकांमध्ये जनजागृती होणे गरजेचे असून, आरोग्य विभागातील सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. बैठकीत नोंदणी प्रक्रियेच्या नियमिततेवर भर देत कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे, असे निर्देशही देण्यात आले.

# बोधडीच्या सरपंचांना सदस्यांनी नाकारले; ग्रामस्थांनी तारले ! विशेष सभेत भिसे ७७ मतांनी विजयी

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्यातील बोधडी (बु.) ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच बालाजी भिसे यांच्याविरोधात ग्रामपंचायतीच्या १५ सदस्यांनी दाखल केलेला अविश्वास प्रस्ताव १५ विरुद्ध ३ मतांनी मंजूर करण्यात आला. मतदारांची मते जाणून घेण्यासाठी सोमवारी (दि.९) आयोजित विशेष ग्रामसभेत मतदान घेण्यात आले. यात ७७ मतांनी विद्यमान सरपंच बालाजी भिसे हे विजयी ठरले.

### हा तर सत्याचाच विजय आहे –बालाजी भिसे

आपल्या मर्जीप्रमाणे कामे होत नसल्याने आटापिटा करणाऱ्या सदस्यांनी अविश्वास ठरावाचे हत्यार उपसले; परंतु, सार्वभौम मतदारांनी सत्तेला कौल दिला, हा सत्याचाच विजय आहे, अशी प्रतिक्रिया सरपंच बालाजी भिसे यांनी दिली.

गोकुंद्यानंतरची मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या बोधडी (बु.) ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच बालाजी भिसे यांच्याविरोधात ग्रामपंचायत सदस्य मीना बानाटे, पाणोजी तोरकड, संजीवनी थोरात,त्रिशला शेळके, अनसूया जमादार,संदीप सावंत, दैवशाला भिसे,अनिता मुंडे, संदीप लाखाडे,राधा आमले,सुनील घुगे, गणेश गवले,मंगल कोतवाल, सुलोचना दराडे व माणिक पेंदोर यांनी विविध कारणे देत दि.२६ मे रोजी अविश्वास ठराव दाखल केला होता. सदर अविश्वास प्रस्तावावर चर्चा, मतदानासाठी दि.२८ मे रोजी ग्रामपंचायत कार्यालयात तहसीलदार शारदा चौंडेकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा पार पडली. यात १५ विरुद्ध ३ अशा मतांनी सरपंच बालाजी भिसे यांच्याविरुद्धचा अविश्वास प्रस्ताव मंजूर करण्यात आला.परंतु, बालाजी भिसे हे लोकनियुक्त सरपंच असल्याने लोकांच्या अर्थात मतदारांची मते जाणून घेण्यासाठी सोमवारी बोधडीच्या अंध विद्यालयात तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी डॉ.शारदा चौंडेकर यांच्या निगराणीत सरपंच अविश्वास ठरावावर विशेष ग्रामसभा पार पडली. सरपंच भिसे हवेत,का नको यावर मत प्रदर्शित करण्यासाठी सकाळी १० ते ५ यावेळेत प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया पार पडली.एकूण ६ हजार ३८१ मतदारांपैकी ३ हजार दोनशे ४७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यात विद्यमान सरपंच नको म्हणत १ हजार ५२८ मतदारांनी मत नोंदविले. तर सरपंचपदावर भिसेच हवेत म्हणत १ हजार ६०५ मतदारांनी मत नोंदविले.मतमोजणीत ११४ मते बाद ठरली. भिसे यांच्यावरील अविश्वास ठराव मंजुरीनंतर अनेकांनी सरपंचपदासाठी देव पाण्यात ठेवले होते. परंतु, जनतेच्या दरबारात भिसेंनाच कौल मिळाल्याने इच्छुकांसह त्यांच्या तथाकथित नेत्यांना चांगलीच चपराक बसली.



**नांदेड–** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड नांदेड रविवारी जिल्हा दौऱ्यावर होते. जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, आमदार आनंदराव बोंढारकर यांनी त्यांचे स्वागत केल. यावेळी शहरप्रमुख तुलजेश यादव व इतर दिसत आहेत.

# शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी उद्यापासून ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्गासह इतर प्रवर्गाच्या इयत्ता आठवी, अकरावी, व्यावसायिक आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये रिक्त असणाऱ्या जागेवर विनामुल्य प्रवेश ऑनलाईन पध्दतीने देण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने ऑनलाईन पध्दतीने शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज भरावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत समाज कल्याण अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना व मागासवर्गीय मुलां-मुलींचे शासकीय वसतिगृह योजना राबविली जाते. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी शासकीय वसतिगृह योजनेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या गरजू व पात्र विद्यार्थी-विद्यार्थीनींकडून नांदेड जिल्ह्यातील एकूण-१६ वसतिगृहांसाठी ११ जून पासून अर्ज आमंत्रित करण्यात येत आहेत.

सन २०२४-२५ मधील इयत्ता ७ वी, १० वी १२ वीचे निकाल जाहीर झाले आहेत. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रीया सुरू करणे आवश्यक असल्याने सन २०२४-२५ मधील स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर केलेल्या व अर्जात त्रुटी असल्याने रिव्हर्ट बॅक केलेले आहेत. बराच प्रदीर्घ कालावधी होऊनही अनेक विद्यार्थ्यांनी रिव्हर्ट बॅक केलेले अर्ज अजून फेर सादर केलेले नाहीत. अशा विद्यार्थ्यांना आपल्या स्वाधार अर्जातील त्रुटी पुर्तता करण्यासाठी १०,जून,२०२५ (मंगळवार) ही अंतीम मुदत देण्यात येत आहे.

गरजू विद्यार्थ्यांनी प्रवेशाबाबतचे अर्ज URL:https://hmasscrutinyworkflow.mahait.org/ या पोर्टलवर ऑनलाईन भरावे व त्याची प्रींट आऊट घेवून सर्व आवश्यक कागदपत्रे सोबत जोडून अर्जाची एक प्रत संबंधित जिल्ह्याच्या ठिकाणी व तालुक्याच्या वसतिगृहातील गृहपाल यांचेकडे सादर करावे. तसेच सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात स्वाधार योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी देखील शासकीय वसतिगृह प्रवेशासाठीचा अर्ज ऑनलाईन भरून त्याची प्रत सर्व कागदपत्रे सोबत जोडून संबंधित गृहपाल यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. शासकीय वसतिगृहासाठी प्रवेश अर्ज न भरल्यास त्यांना स्वाधार योजनेसाठी अपात्र ठरविण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

शासकीय वसतिगृहात विनामुल्य निवास व भोजनासह शैक्षणिक साहित्य, निर्वाहभत्ता, ग्रंथालय, जिम व इंटरनेट वाय-फाय आदी सुविधा विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येतात.

### भगवानराव पाटील डक यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** विजयनगर येथील नांदेड हाउसिंग सोसायटीतील रहिवासी तथा पिंपळगाव (नि) येथील मूळ रहिवासी नांदेड शिक्षक पतसंस्था पतपेढीचे माजी चेअरमन भगवानराव पाटील डक यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. त्यांचा अंत्यविधी मंगळवारी दि.१० जून रोजी दुपारी १२ वाजता गोवर्धन घाटावर होणार आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, सुन, नाती, नातवंडे असा परिवार आहे. नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक विठ्ठल पाटील डक यांचे वडील तर नांदेड पंचायत समितीच्या माजी सभापती संगिता विठ्ठल पाटील डक यांचे सासरे तसेच माजी जिल्हा सरकारी वकील तथा ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ॲड. बी. आर. भोसले यांचे ते मेहुणे होते.

# पाणी तपासणी प्रयोगशाळेत विशेष कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत जागतिक ॲक्रीडेशन दिवसानिमित्त सोमवारी (दि.९) येथील जिल्हा पाणी तपासणी प्रयोगशाळेत विशेष कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमातून नागरिकांमध्ये प्रयोगशाळेच्या कार्यपद्धतीबाबत जागरूकता वाढली असून, गुणवत्तापूर्ण पाणी तपासणी सेवा विषयी विश्वास अधिक दृढ झाला आहे.



या कार्यक्रमात प्रयोगशाळेतील विविध तपासणी प्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. पाण्यातील रासायनिक व जैविक घटकांची तपासणी, NBL Accreditation प्रक्रिया, उपकरणांचे प्रात्यक्षिक तसेच पाणी गुणवत्ता सनियंत्रण प्रणाली अंतर्गत नमुन्यांच्या नोंदणीपासून निकाल मिळेपर्यंतची संपूर्ण साखळी समजावून सांगण्यात आली. याशिवाय, काही निवडक पाण्याचे नमुने तपासून उपस्थितांना प्रत्यक्ष प्रयोगशाळेचा अनुभव देण्यात आला.

जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक नारायण मिसाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. भालचंद्र संगनवार यांच्या मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संगीता पोपलायकर, सचिन अन्नदाते, गोविंद अन्नदाते, मोहम्मद साबीर शेख आदींनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक मिलिंद व्यवहारे, जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार केपेंद्र देसाई, आरोग्य विस्तार अधिकारी एस. पी. गोखले, महेश मुखेडकर, पंडितराव फटींग, आर. एस. गावंडे, मुनीर अली, शेख शादुल, शेख बाबुमियाँ यांची उपस्थिती होती.

### नांदेडच्या रहिमपूर भागात पावणेदोन लाखांची घरफोडी

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील रहिमपूर, दुध डेअरीजवळील शेख मौला शेख मोहम्मद यांचे एक घर फोडून चोरट्यांनी १ लाख ७१ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे.

६ ते ७ जून दरम्यान रात्री चोरट्यांनी घर फोडले. गादीखाली ठेवलेले १४ ग्रॅम सोन्याचे गलसर ९८ हजार रुपयांचे, ७ ग्रॅम सोन्याचे गंठण ४९ हजार रुपये आणि साडे तीन ग्रॅमचे मनीमंगळसुत्र २४ हजार ५०० रुपये असा एकूण १ लाख ७१ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरिक्षक भिसे करत आहेत.

# पोलिसांनी तस्करास पकडून दोन घोरपडीला दिले जीवदान



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** चंदासिंग कॉर्नर जवळ घोरपड विक्री करण्यासाठी फिरणाऱ्या एकाला नांदेड ग्रामीणच्या पोलिसांनी पकडले. त्याच्याकडून दोन घोरपडी जप्त केल्या. असून सोळा हजारांची किंमत असलेल्या या घोरपडींना वनविभागाकडे देण्यात आले.

नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर पोहेको बसंत केंद्र, पोकों असिफ, जमीर, पोका कोवळे यांनी आरोपी दशरथ बलमा धोतरे (वय २७) रा. काकांडी ता.जि नांदेड या ताब्यात घेतले आहे. यावेळी दोन घोरपड (किमत १६ हजार रुपये) जप्त करण्यात आल्या. पोलीस अधिक्षक अविनाश कुमार यांनी सर्व प्रकारच्या अवैध धंदे, अवैध कृती यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सोमवारी (दि.९) रोजी ही कारवाई करण्यात आली.

एक घोरपड ५ किलो वजनाची व दुसरी घोरपड ०.३ किलो वजनाची आहे. पकडलेल्या घोरपडी बाबत वनपरिक्षेत्र अधिकारी नांदेड यांना पुढील कारवाई करण्याचे पत्रक देखुन गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे.जप्त घोरपडी वन परिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे देण्यात आल्या आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

## विशिष्ट बियाणे अन् रासायनिक खतांचा नको आग्रह

शेतकरी खरीप हंगामाच्या लगबगीला लागला असून, शेत मशागती, खते व बियाणे खरेदी करणे सुरू झाले आहे. अनेक शेतकरी विशिष्ट कापूस व सोयाबीन बियाणे वाणाची मागणी करत असल्याचे दिसून येत आहे. बियाण्यामध्ये सर्वच वाण हे उत्कृष्ट दर्जाचे असून भरपूर उत्पन्न देणारे आहेत. त्यामुळे विशिष्ट बियाणे किंवा रासायनिक खताचा आग्रह करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

सोयाबीन पिकात स्वपरागीकरण होत असल्याने शेतकऱ्यांनी सोयाबीन बियाण्याची दरवर्षी बाजारातून नवीन वाण खरेदी करण्याची आवश्यकता नाही. एकदा खरेदी केलेल्या बियाण्याचे योग्य प्रकारे संवर्धन केल्यास बियाणे तीन वर्षांपर्यंत वापरल्यास बियाण्यावरील खर्च कमी होईल. कपाशीतील सर्व वाणाचे बिटी जैव तंत्रज्ञान एकच असून सर्वांची उत्पादन क्षमता जवळपास सारखीच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी एकाच वाणाचा आग्रह धरू नये. पिकाचे उत्पन्न हे जमिनीचा पोत, पाऊसमान, योग्य वेळी केलेली शेती मशागत यावर अवलंबून आहे. पिकाच्या योग्य वेळेत झालेला पाऊस, जमिनीचा उत्तम पोत व वेळी व केलेल्या मशागतीमुळे भरघोस उत्पन्न मिळते. घरच्या सोयाबीन बियाण्याची योग्य चाळणी व बिज प्रक्रीया करून घरच्या घरी उगवणशक्ती तपासून १०० मिली पाऊस पडल्यानंतर २ ते ३ सेंमी खोलीत बियाण्याची पेरणी केल्यास पिक उगवणीबाबत तक्रार राहणार नाही. कुठलेही बियाणे खरेदी करताना पक्के बिल घ्यावे. लेबलवरील लॉट नंबर व बिलातील लॉट नंबर पडताळून पाहावे. गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कपाशी पिकाची लागवड १ जूननंतरच करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## विजेपासून असे राहा सुरक्षित...



**राज्यात वीज पडण्याच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. मान्सूनपूर्व काळात विशेषत: शेतीच्या कामांच्या वेळी, वीज पडण्याचा धोका अधिक असतो आणि यामुळे पशुधनाची हानी होण्याची शक्यता वाढते. सर्व नागरिकांनी जिवीतहानी, प्राणहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने सजग राहून उपाययोजनाचा अवलंब करावा...**

### काय करावे, काय करू नये...

- पूर्वतयारी : आपल्या भागातील स्थानिक हवामान विषयी अंदाजाची व सतर्कतेच्या माहितीचे निरीक्षण करावे. स्वतःसाठी व कुटुंबासाठी वज्राघाताच्या आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सेवेसंदर्भात तसेच स्थानिक यंत्रणांशी संपर्कात राहावे. वैद्यकीय व स्थानिक आपत्कालीन सेवांचे संपर्क तपशील तयार करावे. जर गडगडाटी वादळाचा, अतिवेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्याचा अंदाज असेल तर घराबाहेरील क्रिया पुढे ढकलणे. विजेवर चालणाऱ्या वस्तू, इलेक्ट्रिक व इलेक्ट्रिकल वस्तू आणि वातानुकूलित यंत्रे बंद ठेवण्यात यावीत. आपल्या घराच्या आजूबाजूची वाळलेली झाडे किंवा फांद्या काढून टाकावे.
- घरात असल्यास उपाययोजना : वायरद्वारे जोडले गेलेले फोन, मोबाईल व इतर इलेक्ट्रिकल उपकरणे विद्युत जोडणीस लावू नये. गडगडीच्या वादळ दरम्यान व विजा चमकताना कोणत्याही विद्युत उपकरणाचा वापर करू नका. या दरम्यान अंघोळ करणे, हात धुणे, भांडी धुणे, कपडे धुणे, ही कार्य करू नये, प्रवाहकीय पृष्ठभागाशी संपर्क टाळावा.
- घराबाहेर असल्यास : त्वरित सुरक्षित निवाऱ्याच्या ठिकाणाकडे (मजबूत इमारतीकडे) प्रस्थान करावे, शेतीची अवजारे, मोटार सायकल व इतर वाहने यांच्या पासून दूर रहा, गाडी चालवत असल्यास, सुरक्षित स्थळी जाण्याचा प्रयत्न करा व गाडी सुरक्षित ठिकाणी लावताना मोठ्या झाडापासून तसेच पुराचे पाणी येत असल्यास अशी ठिकाणे वगळून लावावीत.

### वीज पडण्याची कारणे

ढगांमधील पाण्याच्या थेंबांचे आणि बर्फाच्या कणांचे घर्षण होऊन सकारात्मक आणि नकारात्मक विद्युत भार निर्माण होतो. ढग आणि जमीन यांच्यातील विद्युत भाराचे अंतर वाढल्याने एक शक्तिशाली विद्युत क्षेत्र तयार होते. जेव्हा हे क्षेत्र हवेच्या प्रतिकारापेक्षा अधिक होते. तेव्हा वीज जमिनीवर कोसळते. उष्ण आणि दमट हवामान ढगांची जलद निर्मिती करते. ज्यामुळे विद्युत भार लवकर वाढतो. उंच झाडे, पर्वत किंवा धातूच्या वस्तू वीज आकर्षित करू शकतात.

उघड्यावर असल्यास, शेवटचा पर्याय म्हणून लगेच गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये झाकावे, जमिनीशी कमीत कमी संपर्क असावा, मोकळ्या तसेच लटकत्या विद्युत तारांपासून दूर रहावे. जंगलामध्ये दाट लहान झाडाखाली, उताराच्या जागेवर निवारा घ्यावा, इतर खुल्या जागेवर दरीसारख्या खोल जागेवर जाण्याचा प्रयत्न करावे.

- वज्राघात झाल्यास उपाययोजना : त्वरित रुग्णवाहिका व वैद्यकीय मदत बोलवा, वज्राघात बाधित व्यक्तीस त्वरित वैद्यकीय मदत मिळवून द्या. श्वसन बंद असल्यास तोंडावाटे पुनरुत्थान (Mouth-to-Mouth) प्रक्रिया राबवावी. हृदयाचे ठोके बंद असल्यास कुठलीही वैद्यकीय मदत मिळेपर्यंत रुग्णाची हृदय गती CPR चा वापर करून सुरू ठेवावा.

### या ॲप्सचा वापर करा...

- दामिनी ॲप : वीज पडण्याच्या घटनांपासून संरक्षण करण्यासाठी उपयोगी.
- मेघदूत ॲप : हवामान आधारित शेती व्यवस्थापनासाठी शेतकऱ्यांसाठी उपयुक्त.
- सचेत ॲप : आपल्या स्थानानुसार आपत्तीपूर्व सूचना मिळवण्यासाठी मदत करते.
- भूकंप ॲप : भूकंप होण्यापूर्वी सूचना देणारे ॲप.
- आपत्तीजन्य परिस्थिती टाळण्यासाठी व सुरक्षित राहण्यासाठी हे ॲप्स आपल्या मोबाईलमध्ये डाउनलोड करून त्यांचा वापर करावा. सर्व नागरिक व शेतकऱ्यांनी सजग राहून आवश्यक खबरदारी घ्यावी.



## खरीप पिकांसाठी महत्त्वाची सूत्रे

**आपली जमीन समस्यायुक्त (उदा. चुनखडीयुक्त, चोपण, क्षारयुक्त आदी) असल्यास पिकांची पेरणी किंवा लागवड सरी वरंबा किंवा रुंद वरंबा सरी (BBF) वर करावी. म्हणजे उगवण चांगली होते. जास्त पावसात पाण्याचा निचरा व्यवस्थित होऊन वाफसा लवकर येतो. पिकांची पाने पिवळी पडत नाहीत. बियाण्यांची उगवणक्षमता व खतांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. बियांस प्रथम रासायनिक प्रक्रिया केल्यानंतर २ ते ३ तासांनी जैविक अथवा जिवाणूची बिजप्रक्रिया करावी. यामुळे बुरशी किंवा किडींपासून संरक्षण होते. बियाणांची उगवणक्षमता वाढते.**



आपल्याकडील जमिनीत पिकांचे नियोजन करताना पिकांची फेरपालट करावी. यामध्ये एकदलनंतर द्विदलवर्गीय पिकांचा क्रम असावा. या पिकांच्या मुळांची रचनाही पाहावी. म्हणजे जमिनीच्या एकाच थरातील अन्नद्रव्ये घेतली जात नाहीत. द्विदल पिकांच्या मुळांवरील नत्र स्थिरीकरण करणाऱ्या सूक्ष्मजिवाणूंमुळे सुपीकता वाढते. तसेच या पिकाचा पालापाचोळा वाळून वरच्या थरात मिसळला जातो. त्याचे बेवड चांगले होऊन पुढील एकदल पिकाला चांगला फायदा होतो. जमिनीत सेंद्रिय कर्ब व सूक्ष्म जिवाणूंच्या संख्या वाढते. बहुतांशी शेतकरी मक्यावर-मका, तुरीवर-तूर, सोयाबीन-सोयाबीन, ऊस-ऊस, कांद्यावर कांदा अशा प्रकारे पीक पद्धती अवलंबतात. परिणामी रोग व किडींचे चक्र अव्याहत सुरू राहते. प्रादुर्भाव वाढून नियंत्रण खर्चातही वाढ होते. समस्यायुक्त जमिनीची सुपीकता कमी होते. अशा जमिनीमध्ये फेरपालटीत हिरवळीचे पिके (धैंचा, ताग) घ्यावा. त्याची वाढ झाल्यावर ४५ दिवसांनी जमिनीत गाडून टाकावा. नंतर पुढील रब्बी हंगामात पिकाचे नियोजन करावे.

### पेरणीवेळी खताचा बेसल डोस

खरीप हंगामातील पिकांना पेरणीवेळी खताचा बेसल डोस द्यावा. म्हणजे पिकांना बाळसे चांगले येते. बेसलडोसमध्ये शिफारशीत नत्रापैकी अर्धे नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीवेळी द्यावे. उर्वरित नत्र पेरणीनंतर एक महिन्यांनी शक्यतो गाडून द्यावे. जमिनीवर पडलेल्या खतांची कार्यक्षमता कमी होते व ऱ्हास होतो. वाफसा परिस्थितीत पेरणी करताना खते व बियाणे एकाच वेळी यंत्राच्या साहाय्याने किंवा दोन चाडे पाभरीने पेरावे. पेरणीच्या घाईत खत पेरून न दिलेल्या शेतकऱ्यांनी उगवण झाल्यानंतर १५ ते २० दिवसांनी पिकांच्या ओळीपासून १५ ते २० सेंमी बाजूला मोगड्याच्या साहाय्याने खत पेरून मातीआड करावे किंवा खुरपणीपूर्वी जमिनीवर टाकून मातीआड करावे. नारळ, आंबा, चिकू फळबागेमध्येही वयपरत्वे खते वापरली पाहिजेत. पाऊस पडल्यानंतर जून, जुलै महिन्यांत पूर्ण वाढलेल्या फळझाडास ५० किलो शेणखत + २ किलो १५:१५:१५ प्रति झाड द्यावे. दुपारी झाडाची सावली असलेल्या भागात आळे करून खत मातीआड करावे.



### तणनाशकांचा कमीत कमी वापर

पेरणीनंतर उभ्या पिकात जास्त पाऊस पडल्यास निचऱ्याची व्यवस्था करावी. थोडीशी उघडीप मिळाल्यास सायकल कोळपे दोन ओळींत मारावे. म्हणजे जमीन वाफशावर येईल. तसेच पावसाचा खंड पडल्यास पिके पिवळी पडतात. या दोन्ही परिस्थितीत पिकांना पोषकद्रव्ये फवारणीतून द्यावीत. त्यासाठी फुले द्रवरूप सूक्ष्म ग्रेड II (१०० मिलि प्रति १० लिटर पाणी) या प्रमाणे फवारणी करावी. त्यानंतर ४ ते ५ दिवसांनी १९:१९:१९ हे विद्राव्य खत १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून पिकावर फवारणी करावी. शेणखत नेहमी चांगले कुजलेलेच वापरावे. म्हणजे पेरणीनंतर तणांचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात होत नाही. चांगले कुजलेले शेणखत पेरणीपूर्वी शेवटच्या कुळवाच्या पाळीअगोदर जमिनीत शिफारशीनुसार मिसळावे. शक्यतो तणनाशकांचा कमीत कमी वापर उभ्या पिकात करावा. वापर करण्यापूर्वी तणनाशकांचा प्रकार उगवणपूर्व आहे की उगवणीनंतर करायचा, याची माहिती पॅकिंग व सोबत असलेल्या लेबल वाचून मिळवावी. त्यानुसार योग्य त्या मात्रेचा वापर करून जमिनीवर फवारणी नेहमीप्रमाणे पुढे चालत न करता मागे मागे चालत करावी. म्हणजे फवारलेल्या भागावर आपले पाय पडणार नाहीत.

### फळबागेत तणांचा बंदोबस्त

फळबागेत तणांचा बंदोबस्त करताना तणे फुले येण्यापूर्वीच पृष्ठभागालगत कटरने कापून जमिनीवर पसरावीत. या हिरव्या पाल्याचा आच्छादनासारखा वापर केल्यास कुजल्यानंतर सेंद्रिय कर्ब व अन्नद्रव्ये जमिनीत मिसळली जातात. म्हणजेच 'तण देई धन'. नवीन फळबाग लागवडीचे नियोजन



करताना जमिनीमधील प्रातिनिधिक स्वरूपाचा एक खड्डा घ्यावा. त्याच्या वरील बाजूपासून प्रत्येक फुटातील माती खाली मुरूम लागेपर्यंत (जास्तीत जास्त ९० सें.मी.पर्यंत) किमान तीन थरांतील (० ते ३०, ३० ते ६० व ६० ते ९० सें. मी. पर्यंत) वेगवेगळे नमुने घ्यावेत. त्यास पहिला थर, दुसरा थर व तिसरा थर अशी नावे देऊन प्रयोगशाळेतून तपासून घ्यावे. आपली जमीन हलकी असल्यास एक फुटातील एकच नमुना घेऊन तपासणीसाठी पाठवला तरी चालतो. मध्यम खोलीच्या जमिनीत दोन थरांमधील नमुने घ्यावेत, तर खोल काळ्या जमिनीत तीन थरांतील वेगवेगळे तीन माती नमुने घ्यावेत. यातून आपली जमीन फळबागेसाठी योग्य आहे का? आणि यात लावलेली बाग किती वर्ष टिकेल, हे समजते. कारण फळझाडांचे उत्पादित आयुष्य हे जमिनीतील मातीच्या खोलीवर अवलंबून असते. सध्या बहुतांश शेतकरी फक्त वरच्या एक फुटातील थराचा नमुना व त्याचा अहवाल, तोही केवळ अनुदान मिळवण्याच्या उद्देशाने घेतात. मात्र एक फुटाखाली चुनखडीचे थर किंवा पाषाण दगडाची तळी असल्यास बागेतील झाडे फक्त दोन ते तीन वर्षे जगतात. नंतर वाळून नष्ट होतात. कारण कोणत्याही जमिनीच्या थरात १० टक्क्यांपेक्षा चुनखडीचे प्रमाण जास्त असल्यास अन्नद्रव्यांची उपलब्धता कमी होते. अशा जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होते. हुमणी, वाळवी, सूत्रकृमींचा प्रादुर्भाव जास्त वाढू शकतो. जमिनीतील काही थरात समस्या असल्यास पोयटा माती भरून फळबागेचे नियोजन करता येते.

### मर रोगाचा प्रादुर्भाव

खरीप हंगामात उभ्या पिकांत द्विदलवर्गीय पिकांमध्ये (उदा. सोयाबीन, तूर, मूग, उडीद) मर दिसत असल्यास त्याची कारणे शोधून वेळीच उपाययोजना कराव्यात. १५ दिवसांच्या आत नांग्या भराव्यात. हुमणी / कटवर्म अळी असल्यास क्लोरपायरिफॉसची तेवढ्या जागेत पुढे मागे आळवणी करावी. कोरडी किंवा ओली बुरशी मुळांवर आढळून आल्यास ट्रायकोडर्मा आळवणी वाफशावर असताना मुळाशेजारी करावी. अनुभवानुसार मागील हंगामात मर रोगाचा प्रादुर्भाव द्विदल पिकास जास्त दिसून आला असल्यास प्रथम फेरपालट करावी. ५० किलो कुजलेले शेणखतामध्ये २ ते ३ किलो ट्रायकोडर्मा मिसळून जमिनीत ओल असताना टाकावे. भुरक्या चुनखडीयुक्त व चोपण जमिनीत एकरी १० किलो फेरस सल्फेट, ८ किलो झिंक सल्फेट अशी सूक्ष्म अन्नद्रव्येयुक्त खते शेणखतात मिसळून पेरणीपूर्वीच द्यावीत. म्हणजे पेरणीनंतर उगवलेल्या पिकांचा शेंडा पिवळा पडत नाही. पुढे गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळण्यास मदत होते. एकरी ४० किलो कुजलेले शेणखतात वरील सूक्ष्म अन्नद्रव्येयुक्त खते मिसळून आठवडाभर मुरवावीत. ती पिकांच्या दोन ओळींत छोटा चर घेऊन मातीआड करावीत. उभ्या पिकांवर फुले द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्ये ग्रेड II ची १०० मिलि प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी एक महिन्यानंतर आठ दिवसांच्या अंतराने दोन वेळा करावी. म्हणजे पाने पिवळी पडणार नाहीत. कांद्याचे रोप तयार करताना वाफे पद्धतीत बी फोकून न करता १.५ मी. रुंद गादीवाफ्यावर १० सेंमी अंतरावर रेघ मारून बी टाकावे. अशा छोट्या छोट्या बाबींचा शेती नियोजनात आवर्जून समावेश करावा. म्हणजे निविष्ठांवरील खर्चात बचत होते. जमिनीची सुपीकता टिकून राहते.

### मशागतीसाठी अवजारांची निवड

खरीप हंगामात भारी काळ्या खोल, चिकण पोताच्या व कमी निचरा असलेल्या जमिनीत वाफसा आल्यानंतर लगेचच इंग्रजी 'एल' आकाराचे पाते असलेले रोटाव्हेटर अनेक शेतकरी मारतात. मात्र त्यामुळे जमिनीमध्ये अर्धा फुटाखाली ठोका बसतो. जमीन तळी धरते. आधीच कमी निचरा असलेल्या जमिनीत पाणी जिरत नाही. व्यवस्थित वाफसा न आल्यामुळे उगवण चांगली होत नाही किंवा एक महिन्यात पिकांची वाढ खुंटते. त्याऐवजी सरळ पाते असलेल्या रोटाव्हेटर किंवा कल्टिव्हेटरचा वापर करून नंतर पेरणी करावी. याउलट हलक्या, मध्यम किंवा पोयटा जमिनीत 'एल' आकाराचे पाते असलेले रोटाव्हेटर मारू शकता.



## गादीवाफ्यावर भुईमूग लागवड फायदेशीर

**जून महिन्याचा पहिल्या आठवडा ते शेवटचा आठवड्याच्या कालावधीत भुईमुगाची लागवड करावी. लागवड गादीवाफ्यावर करावी. उपट्या जातीची लागवड करताना दोन ओळीत ३० सें.मी. आणि निमपसऱ्या जातीची लागवड दोन ओळींत ४५ सें.मी. अंतर ठेवावे. दोन रोपातील अंतर १० ते १५ सें.मी. ठेवावे.**

भुईमुगासाठी मध्यम, पाण्याचा चांगला निचरा होणारी वाळू व सेंद्रिय पदार्थ मिश्रित जमीन निवडावी. या जमिनीत मुळांची वाढ होऊन आऱ्या सुलभ रितीने जाण्यास तसेच शेंगा चांगल्या पोसण्यासाठी उपयुक्त ठरते. भारी चिकण मातीच्या जमिनीत लागवड करू नये. कारण पावसाचा ताण पडल्यास ही जमीन टणक होते. आऱ्या जमिनीत सुलभरीत्या वाढू शकत नाहीत. परिणामतः शेंगा चांगल्या पोसत नाहीत. भुईमुगाची मुळे, उपमुळे व मुळांवरील गाठीची योग्य वाढ होण्यासाठी तसेच शेंगा चांगल्या पोसण्यासाठी जमीन २० सें.मी.पर्यंत नांगरून २ ते ३ कुळवाच्या पाळ्या देऊन भुसभुशीत करावी. जमिनीचा पोत योग्य प्रमाणात राखण्यासाठी शेवटच्या कुळवणी अगोदर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत समप्रमाणात पसरावे.

- **पाणी व्यवस्थापन :** पाणी उपलब्ध असेल तर पेरणीपूर्वी पाण्याची पहिली पाळी देऊन वापसा आल्यावर पेरणी करावी आणि लगेच दुसरे पाणी द्यावे. फुले, आऱ्या, शेंगा येण्याच्या वेळी आणि शेंगा भरताना पाणी देणे गरजेचे. तुषार सिंचनाने पाणी दिल्यास उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होते.
- **कीड नियंत्रण :** मावा, तुडतुडे , फुलकिडे पाने, फुलोऱ्यातील रस शोषण करतात. त्यामुळे वाढ खुंटते. पाने पिवळी होतात.



### गादीवाफा पद्धत

लागवडीसाठी ९० सें.मी.रुंदीचा गादीवाफा करावा. त्यावर तीन ओळी बसतात. दोन ओळीत ३० सें.मी. आणि दोन रोपात १० सें.मी. अंतर ठेवावे. उपट्या जातीची लागवड करताना दोन ओळींत ३० सें.मी. अंतर ठेवावे. निमपसऱ्या जातीची लागवड दोन ओळीत ४५ सें.मी. अंतर ठेवून करावी. दोन रोपातील अंतर १० ते १५ सें.मी. ठेवावे. या पद्धतीमुळे जादा पाण्याचा निचरा होतो. मुळावरील गाठीची वाढ चांगली होते. जमीन भुसभुशीत होते, आऱ्या जमिनीत सहज घुसतात. शेंगा चांगल्या पोसतात. दाणे व्यवस्थित भरले जातात. शेंगांचा आकार वाढतो. टोकण करताना बियाणे ५ सें. मी. पेक्षा जास्त खोल पडणार नाही याची काळजी घ्यावी. जमीन योग्य वापशावर आल्याशिवाय लागवड करू नये.

- तण नियंत्रण : तणांच्या तीव्रतेनुसार २ ते ३ वेळा खुरपणी करावी. लागवडीनंतर ४८ तासांच्या आत पेंडिमिथॅलीन (१.५ किलो क्रियाशील घटक) ५ लिटर प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फवारणी करावी. गरज असेल तर पेरणीनंतर २० दिवसांनी क्विझालोफॉप इथाइल (५% ईसी) ७५० मिलि प्रती ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फवारणी करावी.
- खत व्यवस्थापन : पेरणीपूर्वी चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. हेक्टरी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरदाची शिफारस आहे. नत्रासाठी युरियाची एक गोणी आणि फॉस्फेटसाठी सिंगल सुपर फॉस्फेटच्या ६ गोण्या घ्याव्यात. किंवा ५० किलोच्या अडीच गोण्या डायमोनियम फॉस्फेटच्या घ्याव्यात. गंधक आणि कॅल्शिअमची गरज आऱ्या आणि शेंगा वाढीसाठी असते. त्यामुळे स्फूरद खते सिंगल सुपर फॉस्फेटच्या स्वरूपात दिली तर त्यातून गंधक आणि कॅल्शिअम ही अन्नद्रव्ये मिळतात. जस्त, लोह, बोरॉन ही सूक्ष्म अन्नद्रव्ये वाढीसाठी महत्त्वाची आहेत.

# मुंबईमध्ये लोकल रेल्वेमधून पडून सहा प्रवाशांचा मृत्यू

## दरवाजावर लटकलेले प्रवासी एक्स्प्रेसला घासले गेले

**मुंबई (प्रतिनिधी)** – कसाऱ्याहून सीएसएमटीकडे जाणाऱ्या लोकलमधून पडून सहा प्रवाशांचा मृत्यू झाला. सकाळी नऊ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. यात काही प्रवासी जखमी झाल्याची माहिती असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. लोकलला लटकलेले प्रवासी एक्स्प्रेसला घासले गेल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे. मृत्यू झालेले सहा जण कसारा-सीएसएमटी लोकलमधील प्रवासी होते, असंही समजतंय. दिवा ते कोपर स्थानकांदरम्यान हे प्रवासी खाली पडले. छत्रपती शिवाजा महाराज टर्मिनलवरून पुष्पक एक्स्प्रेस निघाली होती. तर कसाऱ्याहून सीएसएमटीकडे लोकल जात होती. या लोकलच्या दरवाजावर लटकलेले प्रवासी एक्स्प्रेसला घासले गेले आणि त्यांचा तोल गेला.



घटनास्थळी रुग्णवाहिका पोहोचवण्याची व्यवस्था तातडीने केली जात असल्याची माहिती मध्य रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी स्वप्निल लीला यांनी दिली. त्याचप्रमाणे या घटनेनंतर रेल्वे वाहतुकीवर कुठलाही परिणाम झाला नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. हे प्रवासी रेल्वे रुळावर नाही, तर रुळाच्या बाजूला पडले, असं लीला यांनी सांगितलं आहे. पाच प्रवासी मुंब्रा स्थानकाजवळ रेल्वेतून खाली पडले. कसाऱ्याला जाणाऱ्या रेल्वेच्या गार्डनं याबाबतची माहिती दिली. नेमक्या कोणत्या गाडीतून प्रवासी खाली पडले, याबाबत अद्याप माहिती नाही. कसाऱ्याला जाणारी लोकल आणि पुष्पक एक्स्पेस बाजूनेच जात होत्या. त्यामुळे कोणत्या ट्रेनमधून हे प्रवासी खाली पडले, हे समजू शकलेलं नाही, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली. धावत्या रेल्वेतून आणखी काही प्रवासी खाली पडल्याची माहिती मिळतेय. नेमकं काय घडलं होतं, याबाबती माहिती समोर आली नाही. दरम्यान जखमींना उपचारासाठी तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर मृत प्रवाशांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे. हे प्रवासी ३०-३५ वयोगटातील असल्याचंही समजतंय. सकाळी ९ वाजताच्या सुमारास ही घटना घडली आहे. ठाण्यातील मुंब्रा रेल्वे स्थानकावर सीएसएमटीकडे जाणारे काही प्रवासी ट्रेनमधून पडले. ट्रेनमध्ये अधिक गर्दी असल्यामुळे प्रवासी पडले असं सांगण्यात येत आहे. रेल्वे अधिकारी आणि पोलीस घटनास्थळी पोहोले असून जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे. अपघाताची चौकशी सुरू असून घटनेमुळे स्थानिक सेवांवरही परिणाम झाला आहे अशी माहिती मध्य रेल्वेने दिली आहे.

# 'पीओपी'च्या मूर्तींवरील बंदी उठवली

## हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय; मूर्तिकार अन् मंडळांना दिलासा

**मुंबई (प्रतिनिधी)** – गणेशोत्सवपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. प्लास्टर ऑफ पॅरिस म्हणजेच पीओपीच्या गणेश मूर्तींवरील बंदी आता उठवण्यात आली आहे. या निर्णयामुळे मूर्तिकार आणि गणेशोत्सव मंडळांमध्ये समाधानाचं वातावरण निर्माण झालं आहे.



मुंबई उच्च न्यायालयाने पीओपी गणेश मूर्ती तयार करणे आणि विक्री करण्यावर असलेली बंदी उठवली आहे. मात्र, या मूर्तींचे विसर्जन हे नैसर्गिक जलस्रोतांऐवजी कृत्रिम तलावांमध्येच करण्याची अट कायम राहणार आहे. या निर्णयावर न्यायालयात दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली आहे.

सरकारला समिती नेमण्याचे आदेश तर न्यायालयाने राज्य सरकारला तीन आठवड्यांच्या आत एक समिती नेमून पीओपी मूर्तींच्या विसर्जनासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातील, त्याविषयी सविस्तर आणि सखोल माहिती न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयानंतर आता घरगुती गणपतीसाठी बनवलेल्या छोट्या पीओपी गणेश मूर्ती साकारण्यास आणि गणेशोत्सव मंडळांमध्येही अशा मूर्ती विराजमान करण्यास कोणताही अडथळा राहिलेला नाही. मात्र, पर्यावरणपूरक विसर्जनाच्या अटींचे पालन अनिवार्य राहील. या निर्णयामुळे अनेक मूर्तिकारांना दिलासा मिळाला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की ते कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये कोणत्याही पीओपी मूर्तींचे विसर्जन करण्यास परवानगी देणार नाही.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) तज्ज्ञ समितीने शिफारस केली आहे की, पीओपी मूर्ती तयार करता येतील. परंतु नैसर्गिक जलसाठ्यात विसर्जित करता येणार नाहीत. सीपीसीबी समितीने असे म्हटले आहे की, अशा मूर्ती फक्त कृत्रिम जलसाठ्यात विसर्जित केल्या जाऊ शकतात. पीओपी बनवलेल्या मूर्तींच्या विसर्जनाबाबत आता राज्य सरकारला विवेकबुद्धी वापरावी लागेल आणि निर्णय घ्यावा लागेल, असे खंडपीठाने म्हटले आहे. सुनावणी दरम्यान मोठ्या मूर्तींच्या विसर्जनाबाबत एकमेव मुद्दा समोर आला.– न्या. मारणे यांनी मंडळांना दरवर्षी एक मूर्ती बनवून ती सुरू ठेवण्यास सांगितले जाऊ शकते का? असा सवाल उपस्थित केला. – राज्याचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांनी मोठ्या मूर्तींसाठी काही सवलत मागितली आहे. ते म्हणाले की, या मोठ्या मूर्ती (२० फूट आणि त्याहून अधिक उंचीच्या) आपल्या संस्कृतीचा भाग बनल्या आहेत. सीजे आराधे यांनी म्हटले की, आम्हाला खात्री आहे की, कोणत्याही पीओपी मूर्तीचे नैसर्गिक जलसाठ्यात विसर्जन करण्याची परवानगी दिली जाणार नाही. तुम्ही कृत्रिम जलसाठे तयार करू शकता आणि तेथे पीओपी मूर्तींचे विसर्जन करू शकता. एजी सराफ यांनी म्हटले की, जर मंडळांनी कायमस्वरूपी त्याच मूर्तीचा वापर केला तर राज्य म्हणून आम्ही त्यात अडथळा आणणार नाही. यावर सीजे आराधे यांनी हो, तुम्ही निर्णय घ्या, असे म्हटले आहे.

# पुण्यात निवासी डॉक्टरची आत्महत्या

**पुणे (प्रतिनिधी)** – रुबी हॉल क्लिनिकमध्ये रेडिओलॉजी विभागात कार्यरत असलेल्या युवा निवासी डॉक्टर श्याम व्होराने (वय २८) गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. रविवारी रात्री उशिरा ही घटना घडली आहे.



ढोले पाटील रस्त्यावरील डॉक्टरांच्या हॉस्टेलमध्ये त्याने जीवन संपवलं. सोलापुरातील डॉ. शिरीष वळसंगकरांच्या आत्महत्येनंतर सारेच हादरले होते. त्यानंतर काही दिवसांत सोलापुरातील एका शिकाऊ डॉक्टरानेही वसतीगृहात हात व गळा चिरुन आत्महत्या केली. त्यानंतर पुण्यातून ही धक्कादायक बातमी समोर आली आहे. डॉ. व्होरा हा गुजरातमधील भावनगरचा रहिवासी आहे. गेल्या एक वर्षापासून तो पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये रेडिओलॉजी डायग्नोसिस विभागात निवासी डॉक्टर म्हणून कार्यरत होता. दामोदर भवन या इमारतीमध्ये रुबी हॉलच्या डॉक्टरांसाठी वसतिगृह आहे. यामध्ये ८० ते १०० डॉक्टरांची राहण्याची सोय करण्यात आलेली आहे. डॉ. व्होरा याच इमारतीत इतर डॉक्टरांबरोबर राहत होता.

# नारी शक्तीच्या कामगिरीने संपूर्ण देशाचा अभिमान वाढवला –पंतप्रधान

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – आपल्या माता-भगिनी-कन्यांनी प्रत्येक टप्प्यावर आव्हानांना सामोरं जावं लागणारा काळ पाहिला आहे. पण आज, त्या केवळ विकसित भारत घडवण्याच्या संकल्पात सक्रिय भागच घेत नाहीत, तर शिक्षणापासून उद्योजकतेपर्यंत प्रत्येक क्षेत्रात नवीन मानदंडही प्रस्थापित करत आहेत. मागील ११ वर्षांत, आपल्या नारी शक्तीच्या कामगिरीने संपूर्ण देशाचा अभिमान वाढवला आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले.

पंतप्रधानांनी 'एक्स' वर पोस्ट मालिकेद्वारे टिप्पण केले आहे. मोदी यांनी ११ वर्षात महिलांच्या नेतृत्वाखालील विकासावर सरकारचे लक्ष अधोरेखित करून विकसित भारताच्या प्रवासात महिलांनी बजावलेल्या परिवर्तनकारी भूमिकेवर प्रकाश टाकला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, एनडीए सरकारने प्रभावी उपक्रमांच्या माध्यमातून महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाची पुनर्व्याख्या केली आहे, असे पंतप्रधानांनी नमूद केले. स्वच्छ भारत अभियानाद्वारे सन्मानाची खात्री देणे, जनधन खात्यांद्वारे आर्थिक समावेश आणि तळागाळातील सक्षमीकरण यांचा समावेश आहे.

उज्ज्वला योजनेचे उदाहरण देत त्यांनी अनेक घरांमध्ये धुरमुक्त स्वयंपाकघरे आणणारा एक मैलाचा दगड म्हणून उल्लेख केला. मुद्रा कर्ज योजनेमुळे लाखो महिला उद्योजक झाल्या असून, त्यांची स्वप्ने पूर्ण करू शकल्या आहेत, हे देखील त्यांनी अधोरेखित केले. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महिलांच्या नावावर घरे देण्याने त्यांच्या सुरक्षिततेच्या आणि सक्षमीकरणाच्या भावनेवर उल्लेखनीय परिणाम झाला आहे. पंतप्रधानांनी बेटी बचाओ बेटी पढाओ मोहिमेची आठवण काढत ही चळवळ मुलींच्या संरक्षणासाठी एक राष्ट्रीय चळवळ असल्याचा उल्लेख केला. मोदी म्हणाले की, विज्ञान, शिक्षण, खेळ, स्टार्टअप्स आणि सशस्त्र दलांसह सर्व क्षेत्रांमध्ये महिला उत्कृष्ट कामगिरी करत आहेत आणि अनेकांना प्रेरणा देत आहेत.

# सामाजिक न्याय विभागाचा आज राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा

**मुंबई (प्रतिनिधी)** – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २०२३-२४ या वर्षासाठी राज्यभरातून एकूण १३० सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारांचे वितरण १० जून रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे होणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे यशस्वी आयोजन होण्यासाठी सर्व यंत्रणांनी नियोजनाप्रमाणे काम करण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सामाजिक न्याय विभागाचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याच्या नियोजनाचा आढावा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे घेतला. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री श्री. शिरसाट म्हणाले, हा पुरस्कार वितरण सोहळा प्रेरणादायी ठरावा यासाठी प्रत्येक बाबीकडे बारकाईने लक्ष द्यावे. कामाच्या नियोजनाप्रमाणे आराखड्याची अंमलबजावणी करावी व दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. मंत्री संजय शिरसाट यांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बैठक व्यवस्था, स्वच्छता, वाहनतळ व्यवस्था, आरोग्य व्यवस्था आदींचा आढावा यावेळी घेतला.

# छत्रपती शिवाजी महाराज गौरव सर्किट हा प्रेरणादायी प्रवास– मुख्यमंत्री फडणवीस

## छत्रपती शिवाजी महाराज सर्किट रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून केला शुभारंभ

**मुंबई (प्रतिनिधी)**– भारतीय रेल्वेची गौरव यात्रा अंतर्गत आज पासून सुरू होणारा छत्रपती शिवाजी महाराज सर्किट हा प्रवास सर्व प्रवाशांसाठी एक प्रेरणादायी अनुभव असेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे छत्रपती शिवाजी महाराज सर्किट अंतर्गत भारत गौरव रेल्वेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा आणि स्वातंत्र्य इतिहास जिवंत ठेवण्याचे काम या रेल्वेच्या माध्यमातून होणार आहे. आज या रेल्वेतून सातशे पेक्षा जात प्रवासी प्रवास करत आहेत. यातील ८० टक्के प्रवासी हे चाळीस वर्षाच्या आतील आहेत. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, सांस्कृतिक विभागाचे सचिव विकास खारगे, पर्यटन प्रधान सचिव अतुल पाटणे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज कुमार सूर्यवंशी, भारतीय रेल्वेचे जनरल मॅनेजर धर्मवीर मीना, आय आर सी टी सी चे राहुल हिमालियन, महाराष्ट्र पर्यटन विभागाचे विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, वरिष्ठ व्यवस्थापक संजय ढेकणे यांच्यासह रेल्वेचे अधिकारी, प्रवासी उपस्थित होते.रेल्वे मधुन प्रवास करणाऱ्या पर्यटकांचे रेल्वे स्थानकावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे कडून पारंपरिक ढोल-ताशा यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. पर्यटकांना पुष्प गुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. पर्यटकांना महाराष्ट्र राज्यातील पर्यटनाच्या दृष्टीने तयार करण्यात आलेली माहिती पत्रके वाटून माहीती देण्यात आली. एकूणच उत्साही वातावरणात पर्यटकांना या प्रवासासाठी रवाना करण्यात आले.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेत महत्त्वपूर्ण बदल; वयोमर्यादेची अट हटवली, प्रकल्प किंमत मर्यादा वाढवली

**लातूर (प्रतिनिधी)** – राज्य सरकारने सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायासाठी आर्थिक मदत देणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात महत्त्वाचे बदल केले असून, सुधारित शासन निर्णय बुधवारी जारी करण्यात आला. योजनेत सेवा उद्योग, कृषि पूरक व्यवसाय, ई-वाहतूक, ब्रँड आधारित विक्री केंद्रे, फिरते विक्री केंद्रे, खाद्यपदार्थ केंद्रे, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल, ढाबा, होम स्टे, क्लाऊड किचन, जलक्रीडा आणि प्रवासी वाहतुकीसाठी बोट व्यवसाय यांचा समावेश करण्यात आला आहे.

यापूर्वी अनुसूचित जाती-जमातींसाठी ५० वर्षे आणि इतर प्रवर्गासाठी ४५ वर्षे असलेली वयोमर्यादा आता पूर्णपणे हटवण्यात आली आहे. प्रकल्पाची कमाल किंमत सेवा आणि कृषि पूरक उद्योगांसाठी २० लाखांवरून ५० लाख रुपये, तर उत्पादन उद्योगांसाठी ५० लाखांवरून १ कोटी रुपये करण्यात आली आहे. अनुसूचित जाती-जमातीच्या लाभार्थ्यांना सेवा उद्योगासाठी शहरी भागात २५ टक्के (कमाल ५ लाख) आणि ग्रामीण भागात ३५ टक्के (कमाल ७ लाख) अनुदान मिळेल. उत्पादन उद्योगासाठी २५ टक्के (कमाल १२.५ लाख) आणि ३५ टक्के (कमाल १७.५ लाख) अनुदान मिळेल. इतर प्रवर्गांसाठी सेवा उद्योगात शहरी भागात १५ टक्के (कमाल ३ लाख) आणि ग्रामीण भागात २५ टक्के (कमाल ५ लाख), तर उत्पादन उद्योगासाठी शहरी भागात १५ टक्के (कमाल ७.५ लाख) आणि ग्रामीण भागात २५ टक्के (कमाल १२.५ लाख) अनुदान मिळेल. कर्ज मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना सेवा आणि कृषि पूरक उद्योगांसाठी १ आठवडा, तर उत्पादन उद्योगांसाठी २ आठवड्यांचे उद्योजकीय प्रशिक्षण अनिवार्य आहे. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्यांनाच कर्ज आणि अनुदान मिळेल. लाभार्थ्यांना ऑनलाइन किंवा ऑफलाइन प्रशिक्षण आणि प्रशिक्षण केंद्र निवडण्याची मुभा आहे. लातूर जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८





## ड्रायव्हर पाहिजे

अनुभव असणारा प्रामाणिक आणि वेळेचे भान असणारा व्यक्ती ड्रायव्हर म्हणून हवा आहे.लायसन्स असणे आवश्यक पगार रूपये १५,००० ते २०,०००(अनुभवावर अधारित)

स्थळ किनवट

मो.७६२०८५४९७०


# अहमदपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील –सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**लातुर (प्रतिनिधी)** – अहमदपूर शहरात पायाभूत सुविधांची निर्मिती करून विकासाला गती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नरत असल्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.



अहमदपूर नगरपालिकेच्या अग्निशमन अधिकारी आणि कर्मचारी निवासस्थान इमारतीचे लोकार्पण सहकारमंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी उपविभागीय अधिकारी तथा नगरपालिकेच्या प्रशासक मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्ज्वला पांगरकर, मुख्याधिकारी संतोष लोमटे आदी उपस्थित होते.

जिल्हास्तर योजनेंतर्गत अग्निशमन आणि आणीबाणी सेवांचे बळकटीकरण करण्यासाठी अग्निशमन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थान इमारतीची उभारणी करण्यात आली आहे. यामुळे अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांना सुसज्ज निवासस्थाने उपलब्ध झाली आहेत. तसेच, नगरपालिकेला एक मिनी रेस्क्यू टेंडर वाहन सुपूर्द करण्यात आले. यामुळे आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ आणि प्रभावी मदत मिळण्यास मदत होईल, असा विश्वास सहकारमंत्री पाटील यांनी व्यक्त केला.

कचऱ्याच्या समस्येवर मात करण्यासाठी अहमदपूर नगरपालिकेने योग्य नियोजन करून आवश्यक प्रस्ताव तयार करावेत, असे निर्देश सहकारमंत्री पाटील यांनी दिले. शहराच्या वैभवात भर घालणारे सर्व सुविधांनी युक्त व्यापारी संकुल उभारण्याचे नियोजन आहे. यामुळे युवकांना उद्योग आणि व्यवसायासाठी जागा उपलब्ध होईल. तसेच, न्यायालय इमारत उभारणी आणि शहरात भूमिगत गटार योजना राबवण्यासाठीही प्रयत्न सुरू असून, या कामांसाठी पुरेसा निधी मिळवण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी नमूद केले.

नगरपालिकेच्या शाळांमध्ये दर्जेदार प्राथमिक शिक्षण देण्यासाठी डिजिटल क्लासरूमसारखे उपक्रम राबवावेत, असेही सहकारमंत्री पाटील यांनी सुचवले. तसेच, नाटक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी अहमदपूर शहरात अद्ययावत सभागृह उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

# विकासकामे गती व पारदर्शकतेने पूर्ण करा –मंत्री राणे

**मुंबई (प्रतिनिधी)** – कारंजा, आनंदवाडी, मिरकरवाडा व ससून डॉक येथील बंदरे ही कोकणाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण आहेत. यातून तेथील लोकांच्या आर्थिक विकासास चालना मिळेल. या बंदरांच्या ठिकाणी सुरू असलेली विकासकामे गती व पारदर्शकतेने पूर्ण करा, अशा सूचना मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.

मंत्रालयात मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाची आढावा बैठक मंत्री राणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीला विभागाचे आयुक्त किशोर तावडे, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश पाठक, उपसचिव श्री. जकाते, सह आयुक्त दिनेश देवरे, प्रादेशिक उपायुक्त प्रकाश भादुले यासह विभाग व महामंडळातील अधिकारी उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, वित्तनगर शासकीय कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म.तरोडा बु.ता. जि.नांदेड येथील तसेच नांदेड वाघाळा महापालिका हद्दतील मौजे तरोडा बु.येथील गट नंबर २१२ मधील प्लॉट नंबर बी-६९ असुन ज्याची साईज ३० बाय ४० असून एकूण क्षे.१२०० चौरस फुट असून ज्यावर ६ रूमचे आरसीसीचे बांधकाम केलेले आहे. बांधकामाची साईज ९०० फुट आहे. सदरील इमारतीत २ संडास बांथरूम व पायऱ्या केलेल्या आहेत.ज्याची चर्तुसिमा पुढील प्रमाणे- पुर्वेस- घर नंबर ७०, पश्चिमेस-घर नंबर ६८, दक्षिणेस - घर नंबर ४५, उत्तरेस-२५ फुटाचा रस्ता आहे.

वरील चर्तुसिमेच्या आतील वर्णाचा प्लॉट नबर बी ६९ हा मो. अकबर मो.सरवर हे या प्लॉटचे मुळ मालक आहेत. सदरील प्लॉट नंबर बी-६९ त्यावरील संपूर्ण आरसीसी बांधकामासहीत त्यांचा सर्वात लहान मुलगा मो.जाकीर मो.अकबर यांना बक्षीस पत्राद्वारे हस्तांतरीत करीत आहेत.याबद्दल कोणास काही आक्षेप, उजर, मालकी हक्क, देवाण घेवाण, कुळ कर्ज इत्यादी काही असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत सचिव / अध्यक्ष वित्तनगर शासकीय कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म.तरोडा बु.ता.जि.नांदेड यांचेकडे लेखी कागदपत्रासह आपला आक्षेप दाखल करावा. मुदत संपल्यानंतर कोणाचाही कोणताही आक्षेप नाही असे ग्राहय धरून घर नंबर बी-६९ बक्षीस पत्राद्वारे हस्तांतरीत करण्यास सहमती देण्यात येईल व बी-६९ हे संबंधीताच्या नावावर हस्तांतरीत करण्यात येईल.मुदतीनंतर आक्षेप स्विकारल्या जाणार नाही.म्हणून हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

**अध्यक्ष**
**वित्तनगर शासकीय कर्मचारी सहकारी**
**गृहनिर्माण संस्था म.तरोडा बु.ता.जि.नांदेड**



## जाहीर प्रगटन

## हे बाळ कुणाचे ?

अनाथाचे नाथ म्हणून काम पाहत असलेली मा. बालकल्याण समीती नांदेड यांनी नदिड जिल्ह्यातील अनेक ० ते ६ वर्ष वयोगटातील अनाथ निराश्रित व निराधार बालकाच्या बाबतीत काम करत असून जन्मदात्या आई-वडिलाना नको असलेली बालके मा. बालकल्याण समीती नांदेड हि र ते ६ वयोगटातील बालकाचे कायम स्वरूपी पुनर्वसनाचे काम पाहत असून असेच कृत्य दिनांक २४/०३/२०२० रोजी मा. पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांच्या हद्दीत लातूर फाटा येथे घडली यावेळी मा. पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांना एक ९ महिन्याचे पुरुष जातीचे बाळ मुलगा नामे रामप्रसाद हे आढळून आले यावेळी मा. पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांनी सदर बालकास मा. बालकल्याण समीती नांदेड यांच्या पुढे दाखल केले यावेळी मा. बालकल्याण समीती नांदेड यांनी सदर बालक मुलगा नामे रामप्रसाद यास काळजी व संरक्षणासाठी श्रीमती नरसाबाई महिला मंडळ वडगाव संचलित शिशुगृह गीता नगर, नांदेड येथे दाखल केले आहे.

बालकास मा. बाल कल्याण समीती नांदेड यांच्या आदेशान्वे मा. पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण जि.नांदेड यांचे मार्फत सदर बाळ हे दिनांक २४/०३/२०२० रोजी पासून काळजी व संरक्षणासाठी श्रीमती नरसाबाई महिला मंडळ वडगाव संचलित शिशुगृह गीता नगर नांदेड जि. नांदेड येथे प्रवेशित असून सदर बालक रामप्रसाद बालक नामे रामप्रसाद वय ५ वर्षे १० महिने हा चांगल्या स्थितीत असून या मुलाचे कायम स्वरूपी पुनर्वसन करावयाचे आहे तरि या मुलाचे कुणी जैविक पालक व नातेवाईक असल्यास त्यांनी सबळ पुराव्यासहित ३० दिवसात खालील पत्यावर संपर्क साधावा असे श्रीमती नरसाबाई महिला मंडळ वडगाव संचलित शिशुगृह गीता नगर, नांदेड येथील अधीक्षक श्री वीरभद्रआप्पा मठवाले यांनी कळविले आहे. तरी हे बाळ कुणाचे असल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्काचा पत्ता

**१) मा. अध्यक्ष बालकल्याण समीती नांदेड मो. क्र. ९४२२१७३३४२ २) मा. पोलीस स्टेशन ग्रामीण नांदेड जि. नांदेड ३) श्रीमती नरसाबाई महिला मंडळ वडगाव संचलित शिशुग्रह गीता नगर नांदेड मो.क्र. ८५५२८००२३२, ९८५०४४१३२८**

**अधीक्षक**
**श्रीमती नरसाबाई महिला मंडळ**
**वडगाव संचलित, शिशुगृह गीता नगर नांदेड.**

